साल अखेर ,, ७

साल अखेर ,, ७ ,, १ ०८

किरकोळ अंकास.......................०४

नोटिशी बद्दल

१० ओळीचे आंत रु० १

दर ओळीस ....०। ०६

दुसरे खेपेस ....०।

Six monthly......... 3 ....,, 8 as

Single copy.................. 4 a

Advertisement.

Below 10 lines ... 2 Rs

Per line over 10 ... 4 as.

Repetition Per ine ...3 as

वऱ्हाडसमाचार.

THE BERAR SAMACHAR

VOLXXX AKOLA MONDAY SEPTEMBER 7 1896 NO35

वर्ष ३० आकोला सोमवार तारीख ७ माहे सप्टेंबर सन १८९६ इ० अंक ३५

मुंबई बँकची ठेव ठेवण्याची बँक.

या सेव्हिंग बँक मध्यें खालील अटीवर ठेव ठेविली जाईल.

कोणत्याही एका वर्षांत ह्मणजे जानेवारीच्या १ ले तारखे पासून तो दिसेंबरच्या ३' तारखे पर्यंत फक्त एक हजारा पर्यंत रुपये ठेविले जातील.

दोन अथवा अधिक मनुष्यांच्या नांवानें देखील एक ठेव ठेविता येईल. व त्यांच्या ह्यातींत, तसेंच त्यांचे पैकीं कोणी वारले तर त्यांचे मागें त्यांच्या पैकीं एकास अथवा अधिक जणांस ठेव काढतां येईल.

एका वर्षांत एक हजार रुपया पर्यंत ठेवलेल्या रकमेवर दरसाल दर शेंकडा २ दोन रुपये व्याज दिलें जाईल. मात्र ५००० पांच हजारा वरील रकमेस व्याज नाहीं.

मुंबई ब्यांक आकोला १०।७।९६. } R. Aitken Agent

नोटीस

नोटीस वेशमी कवताबाई मर्द कडतुजी हढळे रहाणार पार्डी उर्फ एकबुर्जी परगणें वाशीम ता० वाशीम जिल्हे वाशीम यासी खालीं सही करणार नोटीस देण्यांत आहे कीं मौजे मजकुरी वडिलोपार्जीत आमची जमीन वतनदारीची तुमचे नांवे खाते शेत सर्वे नंबर ८ पैकीं, २९।३२ व ३९ असें चार नंबर वहितीचे असून त्यात माझा निमे हिस्सा नोंदलेला भागनितैवयांत आहे व व गढीतील घर वतनदारीचें असून हेंही वडिलोपार्जित आमचे आहे. वरून.

आमचे ऐकण्यांत असें आले कीं आमचे पश्चांत वतनदारीची जमीन व घर तुह्मी परसाजी मापारी पाटील घानोरे खुर्द परगणें वाशीम व मारुती हढळे राहणार आडोळी परगणें वाशीम यांचे जवळ विक्री व गाहाण ठेवीत आहात ह्मणून समजले वरून.

तुह्मास नोटीस देण्यांत येते आहे कीं कडतुजी व आह्मी सख्खे चुलत चुलत भाऊ असून वरील जमीन व घर आमचे वडिलोपार्जीत वतनदारीतील असून कडतुजी मैयत झाले तेव्हां मी १० दिवस वगैरे केले. कडतुजी यांनीं आपसांत असा दस्तेवज करून दिला कीं आमचे पश्चांत सर्वस्वी मानपान वगैरे यांत तुमचा अधिकार आहे. आणि सदर्हू जमीन आमचे ताब्यांतच आहे. आणि अग्रक्रयाचे अधिकार सर्व जिनगानीवर आमचे आहे.

तूं कडतुजीची लग्नाची बायको नसून पाटाची ह्मणजे गंधर्वाची आहे तर तूं विधवा असल्यामुळें वरील आमचे वृत्तीस कोणत्याच गोष्टीबद्दल तुजला विल्हेवाट करण्यास अधिकार पोहचत नाहीं.

तुजला हल्लीं कर्ज वगैरे नसून मूळ पहिले नवऱ्याचे ह्मणजे आधिलेवरचा मुलगा नांवे हरी नाव आहे त्या मुलाकरितां आमची वृत्ती विकून पुन्हा दुसरा नवरा करून आलेले तो पैसा तुह्मी मुलास लावणार ह्मणून बातमी लागली आहे तुह्मी फक्त अन्नवस्त्रांचे मालक आहात आमचे वित्तीस तुह्मास हात घालता येत नाहीं.

तुह्मी आमची वित्ती आमचे परवानगी वाचून विक्री कराल अथवा गाहाण ठेवाल तर ह्या नोटीशीवरून आगाऊ सुचना कळविण्यांत येते कीं सदर्हू वित्ती आमचे ताब्यांत आहे तुह्मी विल्हेवाट करूं नये ह्मणून समजूत देण्यांत आली आहे ही नोटीस लिहून दिली सही तारीख ९ माहे आगष्ट सन १८९६ इ०

सही

हनगुर्जी वल्लद तोलाजी हढळे रहाणार पार्डी उर्फ एकबुर्जी निशाणी असे

सही

पुंजाजी वल्लद तोलाजी हढळे राहाणार पार्डी उर्फ एकबुर्जी परगणें वाशीम निशाणी असे

वऱ्हाडसमाचार

मिती श्रावण वद्य ३० शके १८१८

मुंबईच्या वुईलसन कालेजचे प्रोफेसर वेलणकर एम. ए. यांनीं 'उंच प्रतीचें शिक्षण' या विषयावर एक निबंध वाचला. हे गृहस्थ येशूच्या कळपांत नवे शिरलेले आहेत आणि त्यांच्या मनाची भरारी कांहीं विलक्षण आहे. त्यांस इंडियांतील एकही गोष्ट पसंत नाहीं आणि इंग्लिश लोक ह्मणजे सर्व सद्गुणांची खाण आहे. त्यांच्या व्याख्यानांत त्यांनीं कळविलें कीं, श्रेष्ठ प्रतीच्या शिक्षणाचा पाया चुकला आहे आणि त्यामध्यें विद्यार्थ्यांचीं मनें संस्कृत होत नाहींत. हल्लींचें शिक्षण मिळालेले लोक सर्व कामांत निष्काळजी, ढोंगी, व पोंकळ आंव घालणारे असतात याचें उदाहरण राष्ट्रीय सभेच्या चळवळींतील पुढाऱ्यांचें आहे. मि० दादाभाई नवरोजी हा एक खरा मोहरा; बाकी सर्व कुचकामाचे आहेत.

डाक्टर वेलणकर यांच्या भाषणावर अध्यक्ष डाक्टर पोलन यांनीं एक समर्पक उत्तर दिलें. ते ह्मणाले कीं हल्लीं पाश्चिमात्य गोष्टींचें अनुकरण करण्याची जी सर्वत्र घोडदौड चालू आहे ती फार वाईट आहे. इंडियामध्यें ही पुष्कळ गोष्टी चांगल्या आहेत आणि त्या खरेखर कित्ता घेण्या सारख्या आहेत. इंडियांतील स्त्रीवर्ग युरोपांतील स्त्रियांपेक्षां कमी गुणवान नाहीं. त्यांच्यामध्यें दारिद्र्याला न भितां आयुष्यमार्ग सुखानें क्रमण्याची विलक्षण शक्ती आहे. हा उदात्त विचार वाचकांच्या मनाला फार संतोष देईल व तो विशेष ध्यानांत ठेवण्यासारखा आहे.

चांगला मनुष्य मृत झाला तरी त्याची भलाई लोक वारंवार आठवतात. मृताची पक्की आठवण लोकांस राहावी ह्मणून कधीं कधीं मृताच्या नांवानें कांहीं स्मारकेंही करून ठेवण्याची चाल आहे. दस्तुर एदलजी बहिमनजी हे आकोल्यास निवर्तले तेव्हां पासून त्यांच्या स्मारकाची खटपट वऱ्हाडांत होईल असें कित्येकांस वाटलें होतें पण एदलजी साहेबांचे वास्तव्य बरीच वर्षें हैदराबादेस असल्यामुळें प्रथम स्मारकाची योजना तिकडे गेल्या पंधरवाड्यांत झाली ही दुःखांत सुखकारक बातमी होय. एक सभा खान बहादूर शेख हिसामुद्दीन यांच्या वाड्यांत भरली होती आणि नेटिव व युरोपियन मिळून बरेच लोक जमले होते. खानबहादूरांनीं अडीचशे रुपये वर्गणी दिली आणि पहिल्याच बैठकीला १४४६ रुपयांचे आंकडे पडले. वऱ्हाडांतूनही एदलजी स्मारकफंडाकडे लोक वर्गण्या धाडतील असा अदमास आहे.

सन १८९५-९६ सालीं स्टांप खात्याला एकंदर उत्पन्न रुपये ९२१०५६--१५-६ पै झालें त्या पैकीं खर्च रुपये ५४२६०--११--६ पै वजा जातां बाकी निव्वळ नफा रुपये ८,६६७९,६--४--० पै झाला. स्टांपाच्या उत्पन्नांत दोन प्रकार आहेत. इंडियन स्टांप आक्टा प्रमाणें कांहीं रकम वसूल आली व दुसरी वसूलाची बाब कोर्ट फी आक्टा आक्टा अन्वयें आहे. स्टांप खातें स्थापित झाल्या पासून या खात्याची उत्तरोत्तर भरभराटी होत आहे. व्यापार धंदा देवघेव, व खरेदी विक्री इत्यादि व्यवहार वृद्धिंगत होत असले ह्मणजे साधारण स्टांपांचें उत्पन्न वाढत जातें आणि फिर्यादींचीं कामें वाढत गेलीं ह्मणजे कोर्ट फीच्या उत्पन्नाला वाढवा येत जातो. आणि ब्रिटिश राज्यामध्यें या दोन्ही गोष्टीस उत आला आहे हें निर्विवाद आहे.

जनरल स्टांपाची विक्री एकंदर रुपये ३,३५,२५१--८--२ पै किमतीची झाली. हल्लीं आकोला, बुलढाणा व वणी या जिल्ह्यांतील उत्पन्न वाढलें आहे तथापि उमरावती इलिचपूर व वाशीम हे तीन जिल्हे मागसत चालले आहेत. आकोला जिल्ह्यांत कपाशीचें व धान्याचें पीक चांगलें ह्मणून उत्पन्न वाढलें ह्मटलें तर उमरावती जिल्ह्यांत अशीच स्थिती असावयास पाहिजे होती पण खरा प्रकार तसा आढळत नाहीं. वाशिम जिल्ह्यांत लोक भिकार दशेस अधिकाधीक येत चालले आहेत ह्मणून स्टांपाची विक्री कमी होईल ही गोष्ट कमी संभनीय आहे असें आह्मास वाटतें.

पावती या टिकिटांच्या विक्रीचें जिल्ह्यांच्या मानानें प्रमाण बनविलें तर असें आढळतें कीं, :—

जिल्हा	दरवर्षी किती मनुष्यामागें एक पावतीचें टिकीट लागतें.
आकोला	६
उमरावती	६
इलिचपूर	१०
बुलढाणा	१०
वाशिम	—— १२
वणी	—— १८

एकंदर साहा जिल्ह्यांतील व्यापार धंद्याच्या मानानें वरील आंकडे खऱ्या स्थितीचे दर्शक आहेत तथापि वऱ्हाडांत पावत्या लेखी देण्या घेण्याची वहिवाट फार कमी कमी आहे याला एक कारण लोकांचें अज्ञान, भोळेपणा, व परस्पर विश्वास हीं होय परंतु इंग्रजी कोर्टांचा प्रसार व दरारा जसजसा वाढत जातो ततशी लेखी पावत्यांची जरूरी लोकांस वाटू लागली आहे तेव्हां सालोसाल पावतीच्या टिकीटांचा खप अधिक होत गेला पाहिजे हेंही उघड आहे.

हुंडीचे स्टांप हुंडीच्या व्यवहाराच्या वाढीमुळें जास्त खपले जात आहेत. विशेषें करून ध्यानांत ठेवण्यासारखी गोष्ट ही कीं वणी जिल्ह्यांत हुंडीच्या स्टांपाची विक्रीच बिलकूल नाहीं. वणी जिल्हा अगदीं मागसलेला व अर्ध मुर्धा रानवट स्थितींत आहे हे आपोआप कळून येतें आणि हा जिल्हा सुधारण्यासाठीं वार्षिक शिक्षणबाबीची देणगी लोकल बोर्डाकडे अद्याप अलिशान रेसिडेंट साहेबांनीं मुद्दाम चालू ठेविली आहे तथापि जसा विद्यादानाचा प्रसार पाहिजे तसा होण्यास पुष्कळ दीनावधि लागेल. अलिकडे हुंडीचा व्यापार कमी होण्यास दुसरीं दोन कारणें झालीं आहेत. पोस्टांतून कर्जरोखे, दस्ताऐवज, करारपत्रें इत्यादिकासंबंधानें एकंदर स्टांप रुपये ३०१,६६०--१०--२ पै किमतीचे विकण्यांत आले. या बाबदींत चार जिल्हे कमी उत्पन्न दाख-

वितात तथापि बुलढाणा व वणी हे दोन जिल्हे क्रमाक्रमानें स्टांपांचा उपयोग अधिक करूं लागले आहेत. पोस्टांतून वाटेल तितक्या रकमांच्या नोटा पाठविणें हुंडी पेक्षां अधिक सोयीवार व विनधोकपणाचें झालें आहे. आणि तसेंच ब्यांकेतून तिच्या निरनिराळ्या शाखा आफिसांवर थोडक्या खर्चात हुंड्या मिळत असतात त्यामुळें हुंडीच्या स्टांपाची विक्री पुष्कळ उतरली आहे.

स्टांपांची किरकोळ विक्री करण्याचा परवाना ज्यांस आहे त्यांस एकंदर विक्रीबद्दल रु० १२०२७-१-३ पै अडत द्यावी लागली. मुख्य स्टांप आफिसांतून पोट दुकानीं स्टांपाचा पुरवठा तहशिलींतल्या शिपायाबरोबर स्टांपाच्या थैल्या पाठवून करीत असत परंतु ही व्यवस्था धोक्याची वाटल्यामुळें हल्लीं पोस्टल खात्या मार्फत स्टांप रजिस्टर्ड पारसलांतून धाडण्यांत येत असतात. स्टांप मॉनुअल इतकीं वर्षें इंग्रजींत होतें त्याचा मराठी तर्जुमा रा० रा० विष्णु मोरेश्वर महाजनी एम. ए. यांजकडून करून घेतला आणि त्या कामगिरी बद्दल त्यांस २९० रुपये बक्षीस देण्यांत आलें.

न्याय खात्याचें काम दिवसेंदिवस झपाट्यानें वाढत आहे तेव्हां कोर्टफीच्या उत्पन्नाचे आंकड सालेसाल ज्यास्त झाले हें अगदीं बरोबर आहे. सन १८९४-९५ सालीं रुपये ९६२९८-९-७ पै उत्पन्न होतें तें रिपोर्टाच्या वर्षीं रुपये ९८०७८६-१४-९ पै झालें आहे. गेल्या दहा वर्षांपूर्वींच्या उत्पन्नाचे आंकडे चालूं सालाशी ताडले असतां असें दिसतें कीं:—

जिल्हा	कोर्टफीच्या वाढीचें शेंकडा सन १८८६-८७च्या उत्पन्नावर प्रमाण.
बुलढाणा	९३
उमरावती	५६
अकोला	१३

उमरावतीस हायकोर्ट स्थापित झाल्यामुळें शेंकडा ५६ इतकी वाढ दृष्टीस पडते. बुलढाणा जिल्ह्यांत कज्जे फार वाढले याचें दर्शक वरील प्रमाण उत्तम होय.

नक्कलेच्या फीचें उत्पन्न एकंदर रुपये ३०,३४८-९ आहे आणि हें गुदस्ता पेक्षां सरासरी शेंकडा १० या प्रमाणा जवळजवळ उतरलें आहे. अलिकडे लोक सर्व दाव्याच्या नक्कला घेत नाहींत आणि फक्त फैसला व हुकूमनामा यांच्या नक्कलावर कार्यभाग उरकून घेतात. ही गोष्ट उत्पन्न कमी होण्यास एक मुख्य कारण आहे असें दाखविण्यांत आलें आहे.

अर्जीच्या कागदाचें उत्पन्न रुपये ४७८२-७-९ पै आहे. या कागदाच्या उपयोगासंबंधानें कित्येक कचेऱ्यांतून सक्तीचे हुकूम होत असतात पण ते तसे न होण्यासाठीं कोणी वजनदार वकील मंडळी खटपट करणार नाहीं तों पर्यंत पक्षकारावर अर्जीच्या कागदांचा एक निराळा करच बसल्या प्रमाणें झालें आहे.

एकंदर स्टांपाच्या विक्रीचे परवाने घेतलेले इसम ५८८ या प्रांतांत आहेत आणि सर्व विक्रीच्या ठोकळ मानानें त्यांचा चरितार्थ कसा बसा चालतअसें असावा असें अनुमान आहे.

झालवारचे महाराजांवर विद्युत्पता प्रमाणें पदच्युतीचा प्रसंग येऊन थडकला तेव्हांपासून इंडियांत ब्रिटिश राज्यकारभाराविषयीं अप्रेम व भयप्रद विवंचना उत्पन्न झाली आहे. नेटिव संस्थानिकांवर राज्यभ्रष्टतेची गदा केव्हां येईल याचा नियम उरला नाहीं आणि संस्थानिकांच्या हक्काविषयीं व त्यांच्या पोलिटिकल परतंत्रते विषयीं मोठ्या खेदाचे व विस्मयाचे प्रश्न उम्दूत होऊं लागले आहेत. आमची अशी समजूत होती कीं नेटिव राजेरजवाडे ह्मणजे कांहीं कळसूत्री बाहुली नाहींत, त्यांस स्वतंत्र राज्याधिकार आहेत, आणि त्यांच्या राजनिष्ठेवर व सुयंत्र राज्यव्यवस्थेवर ब्रिटिश साम्राज्याची मातब्बरी आहे. पण हल्लीं ब्रिटिश सरकारचें पोलिटिकल खातें या संस्थानिकांस हस्तंगत करून खरें राज्यकर्ते बनलें आहे. बजेटा संबंधाच्या वादविवादाच्या कामन्स सभेंत नामदार जे. एच रावर्टस यांनीं प्रतिपादित केलें कीं इंडियन राजपुत्रावर जें वरिष्ठ पोलिटकल खातें स्थापित केलें आहे त्यामध्यें पुष्कळ सुधारणा केली पाहिजे आणि असा नियम झाला पाहिजे कीं कोणा राजपुत्रास बडतर्फी किंवा तसली शिक्षा करण्यापूर्वीं एखाद्या स्वतंत्र न्यायधीशा समोर त्याच्या गैरवर्तनाबद्दल व अव्यवस्थित राज्यकारभाराबद्दल पूर्ण चौकशी झाली पाहिजे. पण मि० स्कोबल तेथें विरुद्ध बोलण्यास होते व त्यांनीं सांगितलें कीं इंडिया सरकाराहून निराळें न्यायकोर्टच इंडिय राजपुत्रांला नाहीं. इंडिया सरकारचे कान डोळे व हात पाय ह्मणजे पोलिटिकल एजंट होत आणि एका कुशल मर्मज्ञानें या पोलिटिकल एजंटांस राजपुत्रांचे दरवेशी ह्मटलें आहे. सारांश असा कीं ज्याचा त्यानें वाटेल तसा इंडिया सरकारच्या यंत्राखालीं आपल्या कृतीवर न्यायीपणाचा छाप मारून आणावा.

सर फौलर बजेटावर बोलतांना इंडियांतील करांच्या बोजा विषयीं बोलले. त्या संभाषणांत इंडियाच्या दारिद्र्या विषयीं माजी स्टेट सेक्रेटरीची कबूली आहे. ह्मणूनच भाषणाचा तेवढा भाग विशेष महत्वाचा आहे. ते ह्मणाले कीं कर बसविण्याच्या बाबी इंडियांत फार थोडक्या आहेत आणि या बाबी विरळ असल्यामुळें नवीन कर बसविण्या संबंधानें सरकाचे हातपाय खुडल्या प्रमाणेंच झालें आहे. मीठा वरील कर खरोखर कमी केला पाहिजे आणि खर्च भागून कांहीं शिल्लक जर एखाद्या वर्षीं दिसली तर हाच कर प्रथम बंद केला पाहिजे. हा कर अनिवार्य कारणामुळें बसविण्यांत आला पण तो हल्लीं इंग्लंडच्या इनकमट्याक्स प्रमाणें जबर झाला आहे. हा कर वसूल करणें विशेष सोपें व सायस्कर होतें ह्मणून तो बसविण्यांत व वरचेवर वाढविण्यांत आला. इंडियामध्यें करांचा बोजा फार भारी आहे आणि ही ही गोष्ट कांहीं खोटी नाहीं कीं इंडियन लोक अगदीं निकृष्टावस्थेला व गरीबीला पोंचले आहेत. हल्लीं इतर राष्ट्रा संबंधानें इंडिया मध्यें किती कराचा बोजा आहे हें दाखविण्यासाठीं १ रुपया ह्मणजे २ शिलींग या भावानें खालील प्रमाण सर फौलर यांनीं काढलें आहे:—

देश	करावा बोजा दर माणशी पौं.	शि.	पेन्स
इंग्लंड	२	११	८
स्काटलंड	२	८	१
आयर्लंड	१	१२	५
इंडिया		२	६ $\frac{3}{4}$

या आंकड्यावरून पहिले तीन देश श्रीमंतीच्या किती उच्च शिखरास जाऊन पोंचले आहेत ही गोष्ट चांगली सिद्ध होते. इंडियाचे आंकडे या तीन देशांच्या आंकड्यांशीं ताडण्याच्या योग्यतेचेच नाहींत. विलायतेंत दर माणशी उत्पन्न मोठें आहे आणि त्या मानानें कर भारी आहे. पण इंडियांत उत्पन्न व कर हे आंकडे अगदीं क्षूद्र आहेत आणि एखाद्या भिकाऱ्याच्या इस्टेटीची राजपुत्राच्या वैभवाशीं तुलना करून कांहीं तरी प्रमाण काढण्या प्रमाणें इंडियाची विलायतेशीं तुलना करण्याचा वेडगळपणा होय.

The Berar Samachar

MONDAY SEPTEMBER 7 1896

A Court house and an ale-house are two important adjuncts of the British administration. Both attract people in an immense measure and the influence they exercise is felt to an intense degree. We have mentioned them together but they are neither inter-dependent nor do they claim any close relation between themselves. The sphere of a court of justice is not closely allied in any earthly manner to the sphere of an ale-house. Perhaps the juirisdiction of one may overlap the juirisdiction of the other. It is not also premature to assert that those who resort to each of them may altogether belong to different groups of people. The phases of dissimilarity between the institutions of a court and an ale-house are too many and patent to all. The first serves to satisfy man's love of reason, determines the relations between man and man, and vindicates the rights of one as against the brute force of his fellow being. While a drinking shop supplies the want of a predominent passion in mankind. It subserves the cringings of human nature which, when they err or go wrong, open wide the door of vice, loss of any sense of shame and utter ruin. The Court-house is honored from times immemorial while the ale-house goes with a bad name from the very beginning.

What strikes us most is that both these institutions thrive well under a similar set of circumstances. The growth of wealth is very congenial to their prosperity. But the poverty of the people does on the other hand offer an equally enviable career to them. Both appear like a gambling house where speculation is rife and stakes are valuable. An ale-house proclaims at its very doors the immoral vices that attend its customers. But a court-house is much more dangerous in its effects because it connects itself with all the good names in society and asserts and protects individual liberty, freedom and privileges. It is indeed supreme in so far as it deals out divine justice but the ill of it is that it is more misused than used properly. Litigation is at present like a drink. It holds forth a cup of misery which people test to its full contents. Perjury, bribery and forgery open up a bright avenue for litigation. The legal counsel becomes the willing or unwilling guide to carry litigants through the labyrinth of all laws, rules, and procedures. They are highly paid for their services and unconsciously serve their masters too well. Truthfulness is almost at cent per cent discount and oaths are taken with as much regard to them as to unmeaning legal formula and people are found in hundreds to swear to facts to which they are quite strangers or which they could well invent to serve the *living* present. We may be accused of painting a sombre dark picture of the effects of a court-house but our only excuse is that it reveals or bares open a true side of the character of the people. We deplore that such a state should arrest the real progress of our society; and we earnestly request our people to unlearn the lessons of open lying that is rampant in our court-houses. Let us not suppose however that we are worse than what we were at the advent of the British rule. What we condemn is *false* or *invented* litigation It is this portion that we wish to see abolished and when we advert to its evils in public print we hope we are helping the real reformers to check the free circulation of the counterfeit coin of litigation. Let us propose measures to honor truthfulness in all walks of life.

वऱ्हाड

हवामान—पाऊस आठवडाभर नसल्यामुळें पीकें चांगल्या स्थितींत आहेत. अद्याप हवेंत उष्मा भासतो. रोगराई पुष्कळ कमी झाली आहे.

दस्तुर एदलजी बहिमनजी हे निवर्तल्यामुळें गेल्या मे महिन्याच्या २८ वे तारखेपासून त्यांच्या डेपुटी कामिशनर वर्ग ३ च्या जागे संबंधानें खालील वर्गा वर्गी करण्यांत आली:--

नांव	हुद्दा.
मेजर ग्यारेट (हल्लीं लांड रिकार्डचे डायरेक्टर.)	डिपुटी कमिशनर वर्ग ३
कुमार श्री हरबानजी [बाह्य प्रांतीं]	स्पेशल असि० कमिशनर
मि. रुस्तुमजी फर्दुनजी	स्पेशल असि० कमिशनर
मि. एफ. डब्ल्यू. ए. प्रीडो.	असि. कमि० वर्ग १
राव बहादूर बाळकृष्ण काशिनाथ.जोशी	असि. कमि. वर्ग २

पिंजर येथील देवावरील रक्तींसचनाच्या

…ामध्यें ४ मुसलमान आरोपी पकडले असून त्यांयावर खटला मि. प्रीडो साहेबासमोर चालूं आहे.

मि. बुलक कमिशनर साहेब यांची स्वारी अलिशान रसिडेन्ट साहेबांच्या मुलाखती साठीं हैदराबादेस गेली होती. गेल्या गुरुवारीं साहेब बहादूर परत उमरावतीस गेले.

तारीख १ एप्रील १८९७ पासून तीन वर्षें पर्यंत आकोला, बुलढाणा व वाशीम या जिल्ह्यातीठीं सरकारी डिस्टीलरी मध्यें देशी दारू काढून विकण्याचें कंत्राट ज्यांस घ्यावयाचें असेल त्यांचीं टेंडरें मागविण्यांत आलीं आहेत.

गेल्या गुरुवारीं वकिलीच्या परीक्षेला प्रारंभ होऊन शनिवारीं परीक्षा पुरी झाली. एकंदर २६ उमेदवार होते गुदस्ता कोणाचीच परीक्षा उतरली नाहीं! यंदा काय निकाल हातो तें पहावें. विद्यार्थ्यांच्या तयारी कडे फक्त परीक्षकांची नजर असावी आणि इतर अवान्तर गोष्टी निकालाला साधक किंवा बाधक नसाव्या असा आमचा समज आहे.

शेगांवचे रा. रा. खगव फरसू भाटे त्याजवर खोटी वजनें वापरल्याचा व काहीं इसमास फसविल्याचा आरोप ठेवण्यांत आला आहे. पण पुढें कांहीं कायद्याच्या तक्रारी निघाल्यामुळें हा मोकद्दमा जिल्हा माजिस्ट्रेटाकडे धाडण्यांत आला. येत्या १६ वे ता खेस सदर्हू तक्रारीचा निकाल होणार आहे.

'प्रमोद सिंधु'च्या 'क्ष' नामधारी अकोले करानें येथील मुनसिपालिटीच्या सभासदांच्या दुही संबंधानें मोघमात उल्लेख केला आहे रयतेचें नुकसान निदान होत नाहीं. कृष्ण कारस्थानवाले कालवशात उपहासास व फटफजीतीस कारण होत आहेत. तेव्हां कोळसा कमी उगाळावा तिकें बरें!

ADVERTISEMENT

TENDERS are invited for the Contract for the manufacture and sale of COUNTRY-SPIRIT in the area comprising the revenue districts of Akola Buldana and Basim in the Hyderabad Assigned Districts, for a period of three years from 1st. April 1897, under the Central Distillery, still head-duty and Minimum Guaranteed Revenue system.

Particulars can be obtained on application to the Personal Assistant to the Inspector General of Excise, Amraoti Camp, Berar.

Dated Amraoti 5th. September 1896 } W. Hastings Major Officiating Inspector General of Excise H. A. D.

नमुना [जी]

पं. नादारी मुकदमा नंबर १४ सन १८९६ इसवी.

विद्यमान नादारी कोर्टाचे ज्यड्ज्य जिल्हे अकोले.

धनको— यांस नोटीस देण्यांत येते कीं भगाजीराम परमुलाल मारवाडी राहाणार अकोली ज्याहगीर तालुके अकोट हा नादार आहे असा आज तारीख २९ माहे आगष्ट सन १८९६ इ. रोजीं ठराव झाला आहे. आणि तारीख २६ माहे सप्टेंबर सन १८९६ हा दिवस नादाराचे सावकारांनीं नेमण्या करितां आणि सावकारांनीं आपले तर्फेचा असायनी नेमुन देण्या करितां व नादारानें आपल्या सुटके विषयीं दिलेल्या अर्जाचा निकाल करण्या नेमिला आहे.

नादाराच्या सुटके संबंधी ज्या सावकाराची तक्रार सांगण्याची इच्छा असेल त्या सर्वांनीं त्याबद्दल आठ आण्याच्या स्टांप कागदावर अर्ज लिहून त्या अर्जानें नोटीस द्यावी. त्या नोटिशींत ज्या आधारावरून तक्रार सांगणें असेल ते व त्याजबद्दल ज्या साक्षीस समन्स करण्याची इच्छा असेल त्या साक्षी दारांचीं नांवें नमुद करावी. ही नोटीस नेमण्या करितां नेमलेल्या तारखेच्या निदान तीन दिवस तरी पूर्वी दाखल केली पाहिजे.

कोर्टांत सावकारांनीं पहाण्या करितां नादारानें दाखल केलेल्या यादी उघड्या ठेविल्या आहेत ज्यास नादारावर दावें नोंदविणें असतील त्यांनीं आठ आण्याचे स्टांपावर अर्ज करून त्यांत दाव्याची हकीकत लिहून द्यावी. व ते दावे खरे असल्या बद्दलचा प्रतिज्ञा लेख लिहून त्याजवर अर्जदारानें आपली सही केली पाहिजे.

जे सावकार दूरचे राहणारे असतील त्यांनीं आठ आण्याचे स्टांपावर दाव्याची हकीकत लिहून एखाद्या जुडिशिअल अफिसरापुढें तिच्या खरेपणा विषयीं शपथ लिहावी आणि ती यादी टपालाकडून कोर्टास पाठवावी. ह्मणजे दावें रजिस्टरांत दाखल होतील. कळावे ता० ४ माहे सप्टेंबर सन १८९६ इ.

नंबर	धनको.	रु. आ. पै
१	गुरु मुखराय सुखानंद मारवाडी वस्ती अकोले.	६६३--०--०
१	नरसिंगदास रामरख मारवाडी वा. उमरावती.	९००--०--०
१	साहेबराम मोतीलाल वा. पनज तो. अकोट.	९६५--८--०
१	चतुरभुज. जसकरण वा. अकोली ज्याहगीर तौ. अकोट.	२३३--८--०
१	चोथमल सिवनाथ मारवाडी वा. अकोली ज्याहगीर तो. अकोट.	२६९--०--०
१	मारोति सिताराम पा. वा. चौसाळ तो दर्यापूर	१००--०--०
१	कालुराम दलाल मालक महादेव मारवाडी वा. अकोट.	६३०--०--०
१	छोटमल चुनीलाल मार. वाडी वा. उमरावती.	४४ --४--०
	एकूण	३८०१--४--०

पुनमचंद मोतीलाल या नांवचे दुकान कापड व किराण्याचे असून यांत हिस्सेदार पुनमचंद ⅓ व माझा ⅓ व हरसूक याचा ⅓ या प्रमाणें असून पुनमचंदनें आपला हिस्सा मला दिला या दुकानचें कर्ज देणें ते.—

१	रावजी रामकृष्ण आवंढे वा. उमरावती.	४६९--८--०
१	हरलीमल शामदास मारवाडी राहणार चौसाला तो दर्यापूर.	७९--०--०
१	उसमान बाबाकच्छी राहाणार अकोट.	६६--०--०
१	नरसिंगदास रामरख वा. उमरावती	२८६--०--०
१	मारोती गणेश असलकर राहणार अकोट.	२००--०--०
१	तरफदेली सरनअली वोहोरा वस्ती अकोट	१२--०--०
१	चौथमल सिवनाथ वस्ती अकोली ज्याहगीर.	१८७--४--०
	एकुण	१०९३--०--०

V. N. Dandekar
Judge
Bankruptcy Court
Akola District.

नमुना [जी]

पं. नादारी मुकदमा नंबर १६ सन १८९६

विद्यमान नादारी कोर्टाचे ज्यड्ज्य जिल्हे अकोलें.

खाली लिहिलेले धनको यांस नोटीस देण्यांत येतें कीं, परशाराम वा खानाजी राहणार बेलुरें हा नादारी आहे असा आज तारीख २९ माहे आगष्ट सन १८९६ इ० रोजीं ठराव झाला आहे. आणि तारीख १२ माहे सप्टेंबर सन १८९६ हा दिवस नादाराचे सावकारांनीं नेमण्याकरितां आणि सावकारांनीं आपले तर्फेचा असायनी नेमुन देण्याकरितां व नादारानें आपल्या सुटके विदिलेल्या अर्जाचा निकाल करण्या करितां नेमिला आहे.

नादाराच्या सुटकें संबंधी ज्या सावकाराची तक्रार सांगण्याची इच्छा असेल त्या सर्वांनीं त्या बद्दल आठ आण्याच्या स्टांप कागदावर अर्ज लिहून त्या अर्जानें नोटीस घ्यावी. त्या नोटिशींत ज्या आधारावरून तक्रार सांगणें असेल ते व त्याजबद्दल ज्या साक्षीस समन्स करण्याची इच्छा असेल त्या साक्षीदारांचीं नांवें, नमुद करावी. ही नोटीस नेमण्याकरितां नेमलेल्या तारखेच्या निदान तीन दिवस तरी पूर्वी दाखल केली पाहिजे.

कोर्टांत सावकारांनीं पहाण्या करितां नादारानें दाखल केलेल्या यादी उघड्या ठेविल्या आहेत. ज्यांस नादारावर दावें नोदविणें असतील त्यांनीं आठ आण्याचें स्टांपावर अर्ज करून त्यांत दाव्याची हाकिकत लिहून घ्यावें. व ते दावे खरे असल्या बद्दलचा प्रतिज्ञा लेख लिहून त्याजवर अर्ज दारानें आपली सही केली पाहिजे.

जे सावकार दुरचे राहणारे असतील त्यांनीं आठ आण्याचे स्टांपावर दाव्याची हकीकत लिहून एखाद्या जुडिशियल आफिसरापुढें तिच्या खरेपणा विषयीं शपथ लिहावी आणि ती यादी टपालाकडून कोर्टास पाठवावी. ह्मणजे दावें रजिस्टरांत दाखल होतील कळावें ता. २१।९।९६ इसवी.

नंबर	धनको	रु.
१	माहीदास दुलीचंद दुकानचा मालक सेवाराम राहणार सस्ती तालुके बाळापूर व शामलाल राहणार खामगांव मु. आनंदराव आंबादास	२२९
१	झेगुलाल गुजराथी राहणार बाळापूर.	१००
	एकूण रुपये.	३२९

V. N. Dandekar.
Judge
Bankruptcy Court
Akola District.

नमुना (जी)

नादारी मुकदमा नंबर ९ सन १८९६

विद्यमान पी. गोविंदराज मुदलियार नादारी कोर्टाचे जज्ज जि० वाशीम. यांचे कोर्टांत.

सर्वत्रास जाहीर होणें करितां नोटीस देण्यांत येते कीं जैराम वल्लद गणू मावर वस्ती वाशीम हा नादारी आहे असा आज तारीख १९ माहे आगष्ट सन १८९६ इसवी रोजीं ठराव झाला आहे आणि २६ माहे सप्टेंबर सन १८९६ हा दिवस नादाराचे सावकारांनीं नेमण्या करितां आणि सावकारांनीं आपले तर्फेचा असायनी नेमून देण्याकरितां व नादारानें आपल्या सुटके विषयीं दिलेल्या अर्जाचा निकाल करण्या करितां नेमला आहे.

नादाराच्या सुटके संबंधी ज्या सावकाराची तक्रार सांगण्याची इच्छा असेल त्या सर्वांनीं त्याबद्दल आठ आण्यांच्या स्टांप कागदावर अर्ज लिहून त्या अर्जानें नोटीस द्यावी. त्या नोटिशींत ज्या आधारावरून तक्रार सांगणें असेल ते व त्याबद्दल ज्या साक्षीस समन्स करण्याची इच्छा असेल त्या साक्षीदारांची नांवें नमूद करावी. ही नोटीस नेमण्या करितां नेमलेल्या तारखेच्या निदान तीन दिवस तरी पूर्वी दाखल केली पाहिजे,

कोर्टांत सावकारांनीं पहाण्या करितां नादारानें दाखल केलेल्या यादी उघड्या ठेविल्या आहेत. ज्यास नादारावर दावे नोंदविण असतील त्यांनीं आठ आण्याचे स्टांपावर अर्ज करून त्यांत दाव्याची हकीकत लिहून द्यावी व ते दावे खरे असल्या बद्दलचा प्रतिज्ञा लेख लिहून त्याजवर अर्जदारानें आपली सही केली पाहिजे.

जे सावकार दूरचे राहणारे असतील त्यांनीं आठ आण्याचे स्टांपावर दाव्याची हकीकत लिहून एखाद्या जुडिशिअल आफिसरापुढें तिच्या खरेपणा विषयीं शपथ लिहावी आणि ती यादी टपाला कडून कोर्टास पाठवावी ह्मणजे दावें रजिस्टरांत दाखल होतील कळावें तारीख २७ माहे आगष्ट सन १८९६ इसवी.

P. Govindraj
नादारी कोर्टाचे ज्यडज्य
जिल्हे वाशीम.

वर्तमानसार.

कालोरोडोमध्यें लीड्‌व्हिल येथें एक मोठा विलक्षण बर्फाचा राजवाडा आहे. आंतील चौकटी खेरीज करून तो सारा बर्फाचा कठिण विटांनींच बांधला आहे. तो एवढा मोठा आहे कीं, तीन एकर जमीन त्यानें व्यापिली आहे त्याला मोठमोटाले उंच बुरुज आहेत. एखाद्या अत्यंत प्राचीन दगडी राजवाड्यावरील सुबक कुसरी प्रमाणें, मोठ्या मेहनतीचें बारीक नकशीचें प्रेक्षणीय काम या हिममंदिरावर पुष्कळ आहे, तो बांधण्यास सुमारें ६०,००० रुपये खर्च आला व तो तयार करण्यास दोनशें माणूस चार आटवडे पर्यंत सारखें अहोरात्र खपत होतें. या शुभ्र राजमंदिरांत पंधरा हजार चौरस फूटांचा एक मोठा भव्य दिवाणखाना आहे. वेगवेगळ्या खोल्या तर कितेक आहेत.

बरेच वर्षांपूर्वी एका हिवाळ्यांत मान्ट्रील येथें एक शानदार हिमगृह बांधण्यांत आलें. त्यांत नव्वद चौरस फूटाचें एक दालन असून मध्यभागीं शंभर फूट उंचीचा सुरेख चौकोनी मनोरा आहे. त्याच्या भिंतीला लागलेले बर्फाचे अभेद्य दगड सेंट लॉरेन्स येथून आणले. प्रत्येक भिंत २९ फूट उंच असून कोपऱ्याचे बुरूज पन्नास फूट उंचीचे आहेत. भिंती बांधतांना चुन्याऐवजी पाण्याचा उपयोग केला आहे. यामुळें एका बर्फाच्या दगडाशीं दुसरा जोडतांना मध्यें सांध्यावर घातलेलें पाणी थिजून, अगदीं एक जीव होऊन गेला आहे; सारी भिंत अर्थात बिनसांधी होऊन ती केवळ बर्फाची एकच प्रचंड शिला आहेसें वाटतें. या राजवाड्यांत एकदां विद्युत्प्रकाशानें लखलखाट करून सोडिला होता. तेव्हांचा तो अपूर्व देखावा फारच रमणीय, शुभ्र स्फटिकाच्या महालाहून तो मनोहर दिसे. पारदर्शक चकचीत भिंतीतून आंतल्या लख्ख प्रकाशाचें बाहेर फुटलेलें तेज पाहून हा कांहीं दैविक चमत्कार आहे असेंच वाटे.

इ० स० १७४० या वर्षी सेंट पिटर्सबर्ग येथें बांधलेल्या बर्फाच्या राजवाड्यावर बर्फाच्या सहा तोफा तयार केल्या होत्या. त्या बर्फाच्याच चाकांवर बसविल्या होत्या. त्यांतर्की एकदां एक उडाली. या राजमंदिरांत प्रिन्स ग्याविझन यानें पत्नीसह एक रात्र काढिली होती. करमणूक.

बोलणारें यंत्र—विलायतेहून राय बरेली येथें एक यंत्र आलें आहे, त्याच्या योगानें संभाषण करणाऱ्या मनुष्याच्या सभेंत त्या यंत्रास किल्ली देऊन ठेविलें असतां त्याच्या बोलण्याच्या प्रतिध्वनीच्या रूपानें तें यंत्र अगदीं तसेंच शद्ब बोलतें असा भास होतो.

आनररी मुनसिफ—वायव्य प्रांतांतील पश्चिमोत्तर देशांत आनररी मुनसिफ नेमण्याची खटपट सुरू आहे असें एकतों. असें होईल तर तहसिलदार वगैरे सर्वच कामदार आनररी नेमावे, ह्मणजे सरकारचा खर्च तरी कमी होईल.

गेल्या २४ तारखेस संध्याकाळीं बंगलोर येथील मुसलमान लोक तो दिवस महंमदाचा जन्मदिवस असल्यामुळें त्याचा केस मोठ्या थाटानें मिरवत होते. वाटेंत त्यांस न कोणी भेटत त्यांस ते जागच्या जागीं उभे राहण्यास किंवा बसण्यास सांगत व गाड्यांतून जाणाऱ्या लोकांस खाली उतरण्यास सांगत. अशा रीतीनें केंसाचा छबिना चालला असतां, त्यांस वाटेंत घोड्यांवर बसून जाणारे २ युरोपिअन मिलीटरी कामगार भेटले. त्यांस पाहिल्याबरोबर छबिन्याच्या पुढाऱ्यांनीं त्यांस एकदम खाली उतरण्यास सांगितलें. तसें करण्याचें त्यांनीं नाकारिलें, तेव्हां मुसलमानांनीं त्यांस घोड्यांवरून खालीं ओढलें, व एकानें तर एका कामगारास एक गुद्दाही चढवून दिला. यानंतर त्यानें आपल्या हातांतील वेताच्या छडीनें बऱ्याच लोकांस मारिलें. मुसलमान लोकांचें ह्मणणें आहे कीं, त्यानें प्रथमतः छड्या मारिल्या. अशी बराच वेळ झटापट झाल्या नंतर कामगारांस या वेळीं स्वस्थ बसणेंच शहाणपणाचें होईल. असें वाटून ते स्वस्थ बसले व मग छबिना पुढें निघून गेला. नंतर ते कामगार चौकीवर जाऊन तेथून कांहीं कान्स्टेबल घेऊन मारामारीच्या ठिकाणीं गेले. परंतु तेथे एकही मुसलमान आढळून आला नाहीं. नुसत्या अजमासानें सध्यां धराधरी चालली आहे. मारामारीच्या ठिकाणापासून जवळच एक पलटण असून तींत मुसलमान मुळींच नव्हते. त्या पलटणींतील लोकांस जर मारामारीची बातमी लागती तर फारच भयंकर प्रसंग गुजरला असता.

एका रेलवे लाईनीवर एक युरेशिअन मुलगा तिकिट कलेक्टरच्या जागेवर नेमण्यांत आला होता. त्याच्यानें काम बरोबर होईना ह्मणून निरनिराळ्या ठिकाणच्या तीन स्टेशनमास्तरांनीं त्याजविरुद्ध वरिष्ट अधिकाऱ्याकडे रिपोर्ट केले होते. शेवटीं अधिकाऱ्यांकडून त्यांस पुढील जबाब लिहून गेला:—" यानें आपले पोट तरी भरावें कसें ? तों कांहीं " काळा लोक ", नाहीं त्याच्यानें जसें होईल तसें त्याच्याकडून काम करून घ्या. " न्या. सु.

पर्शीयांत बंडावा सुरू झाल्याची बातमी आली आहे.

अफगाण अमिरानें रशियाच्या ताब्यांत दिलेल्या आक्सस प्रांतांत रशियानें आपल्या वेगळाल्या ठिकाणीं ३ छावण्या स्थापन केल्या.

गंगेच्या महापूरानें समरा घांट येथील बंगालचा ४९० फूट रस्ता वाहून गेला.

हिंदुस्थानांतल्या कारागिरांस आपल्या देशांत आणूं नये असें आफ्रिकेंतील नाटलच्या कारागिरांचें ह्मणणे आहे.

झांजीबारचा सुलतान सयद हमीद मरण पावला व झांजीबारचा राजा मी आहे असें सयद खालीद यानें प्रसिद्ध केलें आहे. याच्या जवळ ७०० हत्यार बंद लोक आहेत.

क्रीट बेटांतल्या दंगेखोर लोकांचे कांहीं मागणें देण्यास टर्की सरकार कबूल झालें आहे तें मिळालें ह्मणजे संतुष्ट राहाण्याचें जर तुह्मी नाकाराल तर युरोपांतल्या बड्या राजांच्या साह्यास तुह्मी मुकाल असें बड्या राजांच्या राजकीय वकिलांनीं त्या दंगेखोर क्रीटन लोकांस बजावलें आहे.

फिलीपाईन बेटांत कांहीं फितुरी सुरू झाल्याचें माद्रीड येथें कळल्यावरून कांहीं लोकांस कैद केलें आहे.

आर्मेनियन लोकांनीं टर्कीची राजधानी कान्स्टांटीनोपल येथें दंगा करून ब्यांक ताब्यांत घेतली. शहरांत इतर ठिकाणींही असेच प्रकार चालू आहेत. सरकारच्या कित्येक शिपायांस ठारही केलें.—बड्या राजांचीं लढाऊ गलबतें पुढें सरूं लागलीं आहेत शेवटीं ते दंगेखोर शरण आले व त्यास कैदेंत ठेवलें आहे.

श्रावण महिन्यांत आमचा देव या जगांत राहात नसून जमिनींत जाऊन पाताळांत राहातो अशी नेपाळी लोकांची समजूत असून ते त्या मुदतींत आनंदाचीं कृत्यें न करितां दुःख्यासारखे राहातात. ते त्या मुदतींत हजामतही करीत नाहींत व मांसाहार न करतां शुद्ध वनस्पतीच्या अन्नावर राहातात. लग्नकार्येंही बंद असतात. त्या मुदतींत ते कोणत्याही रीतीनें एकमेकांत मिसळत नाहींत व गाण्या बजावण्याचें नांवही घेत नाहींत असें सांगतात.

ता. २७ रोजीं इंग्रजांचीं दोन लढाऊ जहाजे झांजीबारच्या बदरांत दाखल होऊन त्यांवरील २९० सोटेबारगीर खलाशी व लढाऊ लोक बंदरावर उतरले आणि गलबतांवरच्या तोफा राजवाड्यावर रोखल्या. हा भडिमार चालू असतां सुलतानानें पळ काढला व तो जर्मनीच्या राजकीय वकीलाच्या आश्रयास जाऊन राहिला आहे.

झांजीबारच्या राज्यव्यवस्थेंत तूर्त बदल करण्याचा इंग्रजसरकारचा इरादा नाहीं असें कळविल्यावरून तेथील लोकांस समाधान झालें आहे.

हें झांजीबारचें राज्य इंग्रजी राज्यांत सामील केल्यास खर्चाचा बोजा फार वाढणार असून बड्या राजांशी विनाकारण वैर होणार आहे असें सांगतात. अ. द.

विलक्षण फेरफार—पूर्वी स्वराज्याच्यावेळीं मणिपुरास १ मण तांदुळांस १२ आणे पडत होते. परंतु हल्लीं त्याच एका मणास ५ रुपये पडूं लागले आहे.

चिलखताचें काम करणारा लोंकरीचा कोटः— व्हियन्ना येथील एका शिंप्यानें एक कोट तयार केला आहे. २४०० यार्डावरून जरी गोळी आली, तरी, तिचा त्या कोटावर कांहींच परिणाम घडत नाहीं ह्यांत पोलादी पत्रा वगैरे कांहींच जड पदार्थ नसून हा फक्त लोकरीचा केलेला आहे. व ह्यामुळें तो हलकाही आहे.

नग्न स्त्रियांचे फोटोग्राफ—इटावा येथील नदीवर बायका अंगें धुत असतां कोणा इंग्रजानें फोटो काढून घेतले! हें सदर फोटोग्राफराचें अत्यंत अनुचित कर्म होय, परंतु कातडी पडली गोरी !

व्हियन्ना येथें पोलंड मधील एक नऊ वर्षाची पियानो वाजविणारी मुलगी आली आहे, पियानोपटु सुद्धां या मुलीविषयीं आश्चर्य करीत आहेत.

देशी कारागिरी— लाहोर येथील एका लालाबक्षीरामशास्त्री नांवाच्या गृहस्थानें आपोआप हालणारा पंखा तयार केला आहे. तो खुर्चीस अगर पलंगास बांधून एकदां त्याला गति दिली, ह्मणजे तो सारखा वेगानें २ प्रहर फिरत राहून आल्हादकारक असा वायु सारखा खेळवितो. ह्या पंख्याची किंमत जवळ जवळ ४० रुपये होईल. ह्या कारागिरीबद्दल पेटेंट मिळण्याकरितां त्यानें अर्ज केला आहे. न्या० सि०

भयंकर दंगा— रामदुर्गाहून धारवाडवृतास एक बातमीपत्र आलें आहे. त्यांत तो बातमीदार लिहितो कीं— तारीख ९ माहे आगष्ट रोजीं दोन प्रहरीं सुरेबानच्या आणि मणीहाळच्या लोकांमध्यें भर रस्त्यावर [सुरेबानास] मोठी मारामारी सुरू झाली. सुरेबानच्या लोकांनीं मणीहाळकरांवर पाषाणवृष्टीला आरंभ केला, तेव्हां अर्थात मणीहाळकर ही पेटले आणि तेही धोंडे फेकूं लागले, अशी मारामारी संध्याकाळपर्यंत जुंपून त्या मारामारींत सुरेबानकर मागे हटले आणि ते गावांत आले, तों गांवातील बायकापोरें गांग रून गेली होतीं. सुरेबानचे कांहीं लोक आपले प्राण वांचविण्या साठीं गांव सोडून दुसरे गांवीं निघून गेले. विजयी झालेले मणीहाळकर मग सुरेबानांत शिरून त्यांणीं लोकांचीं घरें जाळण्याला आरंभ केला. घरांत जें सांपडेल तें सडकेवर आणून त्याची होळीही करीत. इतक्यांत रामदुर्गीला खबर पोचून तेथील हुशार चीफ कानस्टेबल हे निवडक पोलीस घेऊन सुरेबानाला ताबडतोब आले. तोंपर्यंत पण एक तास रात्र झाली होती. त्यांणीं दंगा शांत व्हावा ह्मणून भगिरथ प्रयत्न केले, परंतु त्यांचा उपाय चालला नाहीं. कारण एक तर रात्रीची वेळ, दुसरी गोष्ट पोलीसचे लोक थोडे आणि दंगेखोरांचा जमाव मोठा. बरें जास्त पोलीस आणावे तर मध्यें नदी. ते दिवशीं नदीला महापूर येऊन ती फुगून चालली होती. तेव्हां पोलीस निरूपाय होऊन गेले. त्या रात्रीं सुरेबानचा देखावा फारच भयप्रद झाला होता. मारा मारी जाळा जाळी, हाणाकुटी असेच शद्ब चोंहोंकडून ऐकूं येत होते. गांवांतली एक मसीद व कांहीं इमारती मणीहाळकरांनीं राकेलानें पेटवून दिल्या! याप्रमाणें दंगा उजाडेपर्यंत सारखा चालला होता. उजाडल्यावर जास्त पोलीस आणून चीफ कानस्टेबल याणीं दंगा शांत केला. हल्लीं दंग्याची चौकशी सुरू आहे हा बातमीदार सुरेबानास कुस्त्या पाहण्याकरितां गेला होता. कुस्तीपासून हा दंगा उत्पन्न झाला, किंवा निराळें कारण आहे हें कांहीं कळलें नाहीं.

सुदानच्या दरवेशांवर पाठविलेल्या लष्करांचें काम पुन्हा सुरू झालें आहे.

हिंदुस्थानांतल्या रेलवे संबंधानें योजना करण्याकरितां खातेनिहाय कमेटी ह्या महिन्याच्या अखेरीस सिमल्यास बहुत करून बसणार आहे असें समजतें. श्री. स.

☞ हें पत्र आकोला येथें कै० वा० खंडराव बाळाजी फडके यांचे " वऱ्हाडसमाचार " छापखान्यांत नारायण खंडेराव फडके यांनीं छापून प्रसिद्ध केलें.

साल अखेर „ ७ „ १ ०८
किरकोळ अंकास....................... ०४

नोटिशी बद्दल
१० ओळीचे आंत रु० १
दर ओळीस ०१ ०६
दुसरे खेपेस ०१

Annual in arrears 7 „ 1 Rs. 8 as
Six monthly......... 3 ....„ 8 as
Single copy .... 4 as

Advertisement.
Below 10 lines ... 2 Rs
Per line over 10 ... 4 as
Repetition Per ine ...3 as

वऱ्हाडसमाचार.

THE BERAR SAMACHAR

VOLXXX AKOLA MONDAY 14 SEPTEMBER 1896 NO 36

वर्ष ३० आकोला सोमवार तारीख १४ माहे सप्टेंबर सन १८९६ इ० अंक ३६

मुंबई बँकची ठेव ठेवण्याची बँक.

या सेव्हिंग बँक मध्यें खालील अटीवर ठेव ठेविली जाईल.

कोणत्याही एका वर्षांत ह्मणजे जानेवारीच्या १ ले तारखे पासून तो दिसेंबरच्या ३१ तारखे पर्यंत फक्त एक हजारा पर्यंत रुपये ठेविले जातील.

दोन अथवा अधिक मनुष्यांच्या नांवानें देखील एक ठेव ठेविता येईल. व त्यांच्या हयातीत, तसेंच त्यांचे पैकीं कोणी वारले तर त्यांचे मागें त्यांच्या पैकीं एकास अथवा अधिक जणांस ठेव काढतां येईल.

एका वर्षांत एक हजार रुपया पर्यंत ठेवलेल्या रकमेवर दरसाल दर शेंकडा २ दोन रुपये व्याज दिलें जाईल. मात्र ५००० पांच हजारा वरील रकमेस व्याज नाहीं.

मुंबई ब्यांक
आकोला १०।७।९६. } R. Aitken
Agent

ADVERTISEMENT

TENDERS are invited for the Contract for the manufacture and sale of COUNTRY-SPIRIT in the area comprising the revenue districts of Akola Buldana and Basim in the Hyderabad Assigned Districts, for a period of three years from 1st. April 1897, under the Central Distillery, still head-duty and Minimum Guaranteed Revenue system.

Particulars can be obtained on application to the Personal Assistant to the Inspector General of Excise, Amraoti Camp, Berar.

Dated Amraoti 5th. September 1896 } W. Hastings Major
Officiating Inspector
General of Excise
H. A. D.

वऱ्हाडसमाचार

मिती भाद्रपद शुद्ध ८ शके १८१८

स्वाकीनच्या मोहिमेचा खर्च हिंदुस्थानावर अन्यायानें व दांडगाईनें लादण्यांत आला आणि त्यामुळें राज्यव्यवस्थेला अपायकारक अशी लोकमताची पायमल्ली झाली यामुळें इंडियन प्रजाजन असंतुष्ट अस्वस्थ व निराश आहे हें पार्लमेंटास कळविण्यासाठीं पुष्कळ शहरीं जाहिर सभा भरल्या व भरत आहेत. परंतु लोकांची निराशा इतकी मोठी झाली आहे कीं घडलेल्या अन्यायाचा प्रतिकार करण्या संबंधानें लोकांची मती कुंठित होऊन त्यांस कोणताच उपाय सांप्रत स्थितींत नीटसा सूचत नाहीं. सभा भरवाव्या, अर्ज पाठवावे, लोकमत पृथक पृथक् निर्दिष्ट करावें इत्यादि लौकिकी प्रकार दाद मागण्यांच उपलब्ध आहेत पण त्यापासून ह्मणण्या सारखा उपयोग होत नाहीं. आणि सरकारच्या वर्तनामध्यें लोकमता संबंधानें बधिरपणाचा विकार अतीदृष्टीस पडतो त्यामुळें सर्व उपाय थकले आहेत.

गेल्या १६ वे तारखेस वऱ्हाड सार्वजनिक सभेच्या आश्रया खाली उमरावतीस जाहिरसभा भरली होती व अर्जद्वारा गाऱ्हाणें सादर करण्याचा ठराव झाला तद्वत अकोल्यासही अशीच सभा भरविण्या विषयीं खटपट चालली होती पण लोकांच्या मनाला असल्या निरर्थक सभाविषयीं तिटकारा आला आहे. सभा भरली किंवा सभा न भरली तरी लोकमत उत्तम प्रकारें सरकारास कळून चुकलें आहे आणि या स्वाकीनच्या प्रकरणीं तर लोकमताला इंडिया सरकारचें पाठबळ होतें तेंही कुचकामाचें परिणामी ठरलें हें पाहून इंडियन लोकांची निराशा पराकाष्ठेची झाली आहे.

सध्या तरणोपाय एकच दिसतो. पार्लमेंट मध्यें इंडिया संबंधानें काळजी वाहणारे सभासद अधिक झाले पाहिजेत आणि इंडियाच्या प्रश्नाच्या अनिष्ट निकालावर प्रधानमंडळीची अधिकारभ्रष्टता अवलंबून राहिली पाहिजे. पार्लमेंटमध्यें आपल्या देशाचे सभासद धाडण्या विषयीं अधिकार मिळविला पाहिजे आणि असा अधिकार मिळेपर्यंत आपल्या राजकीय उन्नतीचा मार्ग असाच अवरोधिला जाईल हें उघड आहे. इंग्लंड, स्काटलंड व आयर्लंड या तीन भावंडा प्रमाणें इंडिया हें चवथें भावंड आहे असा ब्रिटिश लोकांमध्यें प्रेमभाव प्रेरित झाला तरच ब्रिटिश राज्याचा चिरायुपणा कायम राहून आपल्या लोकांचा आशावृक्ष फलांनीं ओथंबून जाईल. वर निर्दिष्ट केलेलें संमेलान व एकीभाव अस्तित्वांत आणण्याचे मार्ग शोधून काढण्याचें महत्कार्य राष्ट्रीय सभेनें उत्कृष्ट प्रकारें चालविलें आहे तर त्य सभेचा उत्कर्ष कसा होईल अशाविषयीं रात्रंदिवस प्रत्येक राष्ट्रभक्तानें खरी चिंता करावी एवढेंच आह्मी ठोंक मानानें सुचवूं इच्छितों.

गेल्या आगष्टच्या १३ वे तारखेला कामन्स सभेंत बजेटाचा विषय निघाला होता. दरसाल पार्लमेंटाची सुटी होण्याची घंटा ह्मणजे इंडियन बजेट असतें आणि यंदाचा प्रकार मागील वर्षापेक्षां फारसा निराळा नव्हता. या वर्षी सभासद मामुली प्रमाणेंच हजर होते तथापि पुष्कळ महत्वाच्या विषयावर चांगली भवति न भवता झाली. इंडियाच्या राज्यकारभाराचा खर्च कमीजास्त करण्या संबंधानें इंडिया सरकारावर मोठी जबाबदारी नाहीं ह्मणून एक नवीन कमिटी नेमून पार्लमेंटद्वारा इंडिया सरकारच्या खर्चाच्या पद्धतीवर देखरेख ठेवण्यात यावी अशा मसलतीची सूचना होती पण ती अखेरीस नापसंत ठरली हें आमचें दुर्भाग्य होय. गेल्या १०।१२ वर्षांच्या अवधींत राष्ट्रीय सभेनें पार्लमेंटमध्यें इंडियन प्रश्ना विषयीं जागृती उत्पन्न केली आहे तथापि इंडियनलोकांच्या ह्मणण्याचा यथायोग्य विचार होण्यासारखे राष्ट्रीय सभेचें वजन अद्याप वाढलें नाहीं. रायल कमिशनची चौकशी खर्चाच्या बाबदींत चालूं आहे पण त्या कमिशनच्या उपयुक्ततेच्या भ्रमाचा भोपळा केव्हां कसा फुटेल याचा नेम नाहीं. खर्चाच्या प्रकरणीं इंडिया सरकारचा जाबाब घेणारी कामन्स सभेची कमिटी नको असें प्रतिपादन करितांना नामदार फौलर साहेब ह्मणाले कीं पार्लमेंटाकडे हें नवीन काम आलें तर कार्यबाहुल्यामुळें पार्लमेंटांचा चुराडा होईल आणि वारंवार राज्य व्यवस्थेचे, नवीन कर बसविण्याचें किंवा उत्पन्नाचे प्रश्न निघतात तेव्हां पार्लमेंट आपल्या वादविवादानें इंडिया सरकारास विहित मार्ग दर्शवीत असतेंच आणि गेल्या दोन वर्षांत सिव्हील सर्व्हिसची परीक्षा, कापसाच्या मालावरील आयात कर, अफूचा व्यापार, चित्रळ प्रकरण इत्यादि प्रकरणांत जी चर्चा होत गेली त्यावरून ही गोष्ट लक्ष्यांत येईल कीं इंडियाचा प्रश्न ह्मणजे ब्रिटनचा राष्ट्रीय प्रश्न समजतात आणि त्याच्या निर्णयावर प्रधान मंडळाची क्रांती होत असते. पार्लमेंटचा प्रत्येक सभासद आहे अशी पोकळ गर्वोक्ती करणाऱ्या नामदार साहेबांच्या वरील सोज्वळ अभिप्रायास कितपत मान द्यावा हें निराळें कळविणें न लगे. नामदार साहेब खरी स्थिती कळवितात असें ह्मणण्यापेक्षां ती स्थिती खरोखर कशी पाहिजे हें सांगतात असें मानणें यथार्थ होईल,

सरकारला जेव्हां जेव्हां कर्ज लागलें तेव्हां तेव्हां सरकारनें निरनिराळे व्याजाचे दर नेमस्त करून आपल्या नांवच्या नोटी काढल्या. या नोटी सरकार आपल्या धनकोलाकांस देते. या नोटी बाजारांत विकल्या जातात ह्मणेज ज्याला सरकारी ठेवीतून रुपये काढावयाचे असतील ते आपल्या नोटी ज्यास रक्कम ठेवावयाची असेल त्यास विकतो. या प्रमाणें ठेवींच्या नोटांची अदलाबदल वारंवार होत असते. सरकारनें १८९३-९४ सालीं व १८९३-९४ सालीं दरसाल दर शेकडा साडे तीन व्याजाच्या दरानें कांही नोटी काढल्या होत्या. हा व्याजाचा दर अधिक आहे असें वाटल्या वरून सरकारनें वरील दोन सालच्या ठेवी परत देऊन शेंकडा तीन व्याजानें नवीन कर्ज काढण्याचा विचार केला आहे. हल्लीं सरकारास ३ व्याजानें मुबलक पैसा कर्जाऊ मिळतआहे ह्मणून सरकारनें १८९३–९४ च्या व १८९३–९४ च्या ठेवी वरील १८९७ च्या जानेवारी ३० तारखे पासून व्याज देण्याचें सरकारानें बंद केलें आहे आणि त्यादिवशीं सरकारी ब्यांकेवर ठेवीचा पैसा परत मिळेल. ज्या ठेववाल्या जवळ सदरील दोन सालच्या नोटी असतील त्यांनीं आपल्या नोटी १८९६-९७ सालच्या ३ व्याजाच्या ठेवीमध्यें बदलून घ्याव्या. असा बदल करण्यास सवड तारीख २ आक्टोबर पर्यंत दिली आहे. त्या तारखेपर्यंत सरकारी ब्यांकेंत जुन्या ३॥ व्याजाच्या नोटी देऊन नवीन तीन व्याजाच्या सारख्याच रक्कमेच्या नोटी बदलून घ्याव्या आणि याबदलून देतें वेळीं चालूं साल अखेर पर्यंत ठेववाल्यास ३॥ दरानें व्याज दिलें जाईल आणि त्या शिवाय नोटी बदलण्यास आणणाऱ्या मालकांस किंवा त्याच्या एजंटास १०० रुपया मागें २ आणे या दरानें कमिशन दिलें जाईल.

सरकारानें आपल्या जवळील ठेवींचा या रीतीनें व्याजाचा भाव कमी केला आणि त्यामुळें सालिना व्याजाबद्दल ह्मणून जी रक्कम खर्चीं घालावी लागत होती ती पुष्कळ कमी केली ही गोष्ट चांगली झाली. ही युक्ती अलिकडील दोन चार वर्षांपासून सरकारानें अंमलांत आणिली पण तेव्हांपासून सरकारा वरील लोकांचा विश्वास उडाला आहे. सरकारची शाश्वती व त्यांच्या ठेवींचें नियामित व्याज हीं लक्ष्यांत घेऊन ज्या लोकांनीं सरकारांत ठेवी ठेविल्या आणि आपल्या समक्ष संसारांतील नानाविध गोष्टींची निरवानिरव लावून टाकिली त्या लोकांचे सर्व मनोरथ फसले, सर्व व्यवस्था बिघडल्या आणि सरकारचा शब्द देखील क्षणभंगुर व लटपटीत ठरला हें फार वाईट होय.

थोड्या महिन्या पूर्वी मुंबई प्रसिडेन्सी आसोशिएशननें वैद्यक खात्यांतलि नेमणूका संबधानें स्टेट सेक्रेटरीस अर्ज पाठविला होता. इंडियांतील लष्करी व सिव्हील या दोन्ही राज्यकारभाराच्या शाखेंतून जो लष्करी डाक्टरांचा भरणा केलेला आढळतो तो तसाच चालूं ठेविल्यामुळें वैद्यक शास्त्रास उत्तेजन येत नाहीं, गुणी वैद्यांची प्रतिष्ठा राहात नाहीं, योग्य स्थळीं अयोग्य मनुष्य अधिकारापन्न होतो, नेटिव डाक्टरांच्या पायमल्ली होती, खर्चाचा बोजा देशाच्या आपत्काळीं देखील वाढत चालला आहे इत्यादि विविध गोष्टी त्या अर्जामध्यें स्पष्टपणें नमूद केल्या होत्या. त्या अर्जाला स्टेट सेक्रेटरीची मान्यता मिळो अथवा न मिळो, त्यांतील विधानांची सत्यता व सर्वमान्य तत्वांचें प्रतिपादन हीं पाहून विलायतेस अनुकूळ अभिप्राय प्रगट होऊं लागले आहेत.

या अनुकूळ अभिप्रायाचें दर्शक असें एक पत्र एका थोर मुत्सद्या कडून नुकतेंच वरील असोशिएशनला आलें आहे. या गृहस्थाचा नामनिर्देश सध्यां करूं नये असा विचार दिसतो तथापि हे सद्गृहस्थ या देशांत एका अति श्रेष्ठ पदावर अधिकारी होते आणि ते पेनशन घेऊन गेले असून महा कायदे- पंडित आहेत. यांच्या पत्राचा मतलब असा कीं त्या अर्जातील विचार व प्रार्थना सर्वथैव मान्य आहेत आणि स्टेट सेक्रेटरी व इंडिया आफिस यांनीं त्या अर्जाचें मनन अधिक लक्ष्य लावून केलें पाहिजे. नेहमी इंडियन लोकाच्या अर्जाकडे दुर्लक्ष्य होत असतें तसें या अर्जाकडे दुर्लक्ष्य न होतां या प्रकरणीं विचार होईल अशी आशा आहे. इंग्लंड मधील एखाद्या क्षुद्र कौंटींतील मताधिकारी लोकांनीं क्षुद्र बाबदी संबंधानें पार्लमेंटास अर्ज केला तर त्याच्या बद्दल जो उहापोह होतो तितका उहापोह किंवा विचारपूस इंडियांतील अर्जी संबंधानें होत नाहीं इतकेंच नाहीं तर इंडियाच्या कोट्यावधी प्रजेच्या प्रमुख व लोकमान्य अग्रणी कडून अत्यंत महत्वाच्या व उपयुक्ततेच्या प्रकरणीं आलेल्या अर्जाला देखील कोणी लक्ष्यपूर्वक पहात नाहीं. परंतु कालगतीनें या दुर्लक्ष्याचा प्रतिकार करणारा सोन्याचा दिवस प्राप्त होईल आणि तो दिवस खचित येईल असें समजा. कदाचित माझ्या डोळ्या देखत ही गोष्ट घडणार नाहीं तथापि मला लिहिण्यास आनंद वाटतो कीं आपणा पैकीं पुष्कळ जणांनीं जी चळवळ चालविली आहे ती अधिक वेगानें चालूं ठेवा. या चळवळीच्या योगानें लवकरच इंडियन लोकांच्या दुःखें दूर होतील आणि त्यांचे हक्क सर्वत्र पाळले जातील. ईश्वर करो आणि वर भाकीत केलेला सोन्याचा दिवस या देशाला लवकर लाभो!

√ राष्ट्रीय उत्सव

चालू गणपतीच्या उत्सवाला उद्देशून व मुख्यत्वें करून मुंबई पुण्याकडे अलिकडे जे गणपतीचे मेळे निघूं लागले आहेत त्यांला उद्देशून मुंबईकडील वर्तमानपत्रकर्ते राष्ट्रीय ...ची अवश्यकता दाखवूं लागले आहेत आणि आपापल्या ठरीव मता प्रमाणें सदहू गणपतीच्या मेळ्या संबंधानें अनुकूळ किंवा प्रतिकूळ लेख लिहूं लागले आहेत कारणपरत्वें एक महत्वाचा विषय लोकदृष्टी पुढें खुलावटीनें व उदाहरणासहित येत आहेत ही आनंदाची गोष्ट होय. ग्रीस देशाच्या जुन्या इतिहासांतील राष्ट्रीय उत्सवा संबंधाचे विचार पुष्टीकरणार्थ प्रदर्शित केले जात आहेत आणि राष्ट्रीय उत्सवाची अवश्यकता लोकांच्या मनांत बिंबविण्याचे सद्धेतुक प्रयत्न चालूं आहेत.

तथापि या प्रयत्नाला दिशा चुकीची लागली आहे आणि त्याच दिशेनें विचार व कृती हीं चालूं राहिलीं तर राष्ट्रीय उत्सवाचा दुरुपयोग होईल अशी आह्मास मोठी भिती वाटते. उदाहरणार्थ, केसरीकारांची तत्वें आह्मास कबूल आहेत पण त्यांनीं तीं सांप्रतच्या गणपतीच्या मेळ्यास लागूं करितांना मोठी चूक केली आहे असें आह्मी समजतों. राष्ट्रीय उत्सव हे तात्विक दृष्टया फार उत्तम आहेत. हे उत्सव लोकसमूहामध्यें राष्ट्रीयत्वाची प्रेरणा चांगली करितात, संमेलन प्रचलित करितात, व्यक्तिकार्यापासून राष्ट्रीय कार्याची महती स्पष्टतेनें दर्शवितात, आणि व्यक्तिमात्राचा स्वार्थ विरुद्ध राष्ट्रीय स्वार्थाकडे वळण्यास शिकवितात. पण अशा उत्सवामध्यें खरा राष्ट्रीयपणा नसला आणि दूही, भेदाभेद, व फाटाफूट हीं अस्तित्वांत येऊं लागलीं तर मात्र आडनांवी राष्ट्रीय उत्सव आह्मास नको आहेत. ज्या उत्सवांचें बाह्यरंग व अंतरंग परस्परामध्यें प्रेमवर्धनाला कारणभूत नाहींत ते उत्सव खरोखर उत्सव नसून राष्ट्रीय आपसूर्य आहेत असें आह्मी समजतों आणि मुंबई पुण्याकडील गणपतीच्या मेळ्यामध्यें या आपत्सूर्याचा उदय होत आहे अशी आमच्या मनांत कातरता उत्पन्न होते.

गणपतीचे मेळे किंवा मोहरमचे उत्सव हे धार्मिक दृष्टया त्या त्या धर्माच्या लोकांच्या संमेलनाला व ऐक्य भाववृद्धीला उत्कृष्ठ साधनें आहेत. आणि असे अनुवंशिक व परंपरा चालत आलेले उत्सव दिवसानुदिवस उत्कर्षास पोचले तर आह्मास आनंद होईल इतकेंच नाहीं तर हल्लीं व्यक्तिस्वातंत्र्याच्या नांवाखालीं निरनिराळे धर्मसमाज नष्ट किंवा नामशेष होत चालले आहेत व व्यक्तिमात्रांच्या स्वैर दुर्वर्तनाला प्रतिबंधक समाजमत लयास जात चाललें आहे. ते धर्मसमाज व समाजमत हीं त्या उत्सवांच्या योगानें पुन्हा उर्जीत दशेला येतील आणि पुष्कळ गोष्टी समाजाच्या बळकटीला अनुकूळ होतील. ‘धर्म’ या शब्दानें मनुष्यमात्रावर अनादिकाला पासून फार नामी संस्कार केले आहेत आणि त्या संस्कारा मुळेंच जग नैतिक मार्गांत सुधारलें आहे. तेव्हां धर्मप्रवृत्ती सोज्वळ स्वरूपानें कायम राहतील अशी योजना ज्या उत्सवा मध्यें असेल ते उत्सव समाजांत सुस्थितीला येतील तितके अवश्य पाहिजे आहेत. परंतु धर्मबंधनानें जो तो समाज आपलें पाऊल पुढें टाकीत गेला तर ती प्रगती पायाशुद्ध ठेवण्या विषयीं समाजांतील पुढाऱ्यांनीं काळजी घेतली पाहिजे. पायाशुद्धता ह्मणजे स्वधर्माची प्रतिष्ठा वाढवितांना परधर्माची हेलना होता कामा नये इतकेंच नाहीं तर परधर्मीया बरोबर तटस्था प्रमाणें वागून यथाशक्ती त्यांस परस्परांच्या उत्सवांत अंग घालण्यास ईर्षा आणावी. ही स्पृहणीय स्पर्धा जों पर्यंत आहे तों पर्यंतच सर्व धार्मिक उत्सव राष्ट्रीयपणा एकवटून टाकतील. हल्लींच्या गणपतीच्या मेळ्यांत ही स्पृहणीय स्पर्धा नाहीं आणि त्यांचा उगम देखील परधर्माचा अपमान करण्याच्या गोष्टीनीं घडला आहे आणि ह्मणूनच आह्मास हे मेळे नकोत. धार्मिक उत्सव आपला भिन्नपणा कायम ठेवून देखील जर परस्पर विधर्माच्या उत्सवाला परिपोषक होत गेले तर त्यांस राष्ट्रीय संज्ञेची पात्रता येईल. नाहीं तर परस्परामध्यें यादवी सुरू होऊन धार्मिक उत्सव नष्ट होतील किंबहुना राज्यक्रांती पर्यंत देखील अनिष्ट गोष्टींची मजल पोंचेल. हें विघ्न टळावें आणि सांप्रत आपला देश नानाविध राजकीय आपदांनीं वेष्टिला आहे तेव्हां निदान असल्या आगंतुक किंवा कृत्रिम विघ्नानें देशाचा चुराडा न व्हावा ह्मणून आह्मी आज मुद्दाम लिहिलें आहे.

राष्ट्रीय उत्सव आह्मास अवश्य पाहिजेत पण ते कशा प्रकारचे पाहिजेत याची ठोकळ कल्पना राष्ट्रीय सभेच्या व्यवस्थे पासून चांगली होण्या सारखी आहे ‘राष्ट्रीय सभा’ हा एक आह्मी राष्ट्रीय उत्सव समजतों. जेव्हां राष्ट्रीय उत्सव धर्म-प्रकरणाचा असतो तेव्हां ही गोष्ट लक्ष्यांत बाणली पाहिजे कीं जशा वर्तुळा या परिघा पासून निघालेल्या रेषा मध्यबिंदूंत एकत्र मिळतात तद्वत् विविध धर्मांच्या परिघा पासून निघालेल्या धार्मिक कृति रूपा रेषा इश्वररूपी मध्य बिंदूत एकत्र झाल्या पाहिजेत आणि चोहों दिशेकडून धर्ममार्ग आक्रमण करणाऱ्या लोकांनीं आपल्या समोरील किंवा आजूबाजूच्या लोकांस यथाशक्ति साह्य देऊन आपल्या इच्छित संमेलन-स्थळीं परस्पर वंदन व अभिनंदन केलें पाहिजे. अशी योजना ज्या धर्मविषयक उत्सवांत नाहीं तो उत्सव परधर्माला आनंदकारक नसल्यामुळें स्वसुखाला देखील विषवृक्षा प्रमाणें आहे तेव्हां त्याचीं फळें सेवन करण्याची वेळ न येईल असा विचार सूज्ञांनीं करावा.

धर्मार्थ दवाखाने वऱ्हाडांत ३८ आहेत आणि हे प्रांताच्या विस्ताराच्या मानानें पुष्कळ कमी आहेत. रोगी लोकांस औषधोपचार देण्याच्या सोयी पुष्कळ पाहिजेत परंतु त्या नवीन मिळण्याच्या आशा नाहींत आणि लोक दरिद्री अधिकाधीक होत आहेत यामुळें मनस्वी वाईट वाटतें. सारा वाढविला पण त्या उत्पन्नाच्या वाढींतून धर्मार्थ दवाखान्याकडे अधिक रक्कम खर्च करण्याची सरकारची इच्छा तिळप्राय दिसत नाहीं. आमच्या देशाची वहिवाट अशी आहे कीं राज्यकर्त्यांनीं एकदा करभार घेतला, ह्मणजे सर्व सोयी प्रजेच्या राजानें करून दिल्या पाहिजेत आणि असाच पूर्वापार पाठ चालत आला आहे. पण इंग्रजी रीत व्यक्तिस्वातंत्र्याची आहे आणि राज्यकर्तें आपल्या शिरावर कांहीं घेत नाहींत उत्तरोत्तर लोकांची दीनावस्था होत चालली आहे आणि त्यांच्या वरील नाना करांचा बोजाही भारी झाला आहे तेव्हां धर्मार्थ दवाखान्यांच्या अभिवृद्धी साठीं सरकारानेंच आपला उदार हस्त पुढें केला पाहिजे. अशा कृती खेरीज गत्यंतर दिसत नाहीं. धर्मार्थ दवाखाना आहे असें लिहिताना लिहावयाचें पण अलिकडे तेथें औषध घेणाऱ्या इसमा पासून कांहीं नियमित वार्षिक फी वसूल करण्यांत यावी असा नियम झाल्या पासून धर्मार्थ दवाखाना ही संज्ञा देखील शोभत नाहीं. ही फी घेण्याला कारण असें दाखवितात कीं गरीब लोकांनीं धर्मार्थ दवाखाणी घ्यावें पण तेथें श्रीमंतांनीं किंवा सुखवस्तु लोकांनीं जाऊन फुकट औषध घ्यावें हें अनुचित होय." पण हा कोटीक्रम चुकीचा दिसतो. धर्मार्थ दवाखाना हा प्राचीन पद्धतीवर स्थापित झालेला आहे. हा ज्या फंडावर चालतो तो फंड इस्टेटवाल्या लोकांकडूनच निरनिराळ्या करांच्या रूपानें वसूल केलेला असतो, तेव्हां त्या दवाखान्यांत इस्टेटवाल्या लोकांनीं औषध फुकट घेतलें तर त्यांत दोष कोणता आहे हें आह्मास कळत नाहीं. आणि दवाखान्यांत गरीबांस फुकट औषध देण्यांत आलें तर तें राष्ट्रीय रचनेला अनुसरूनच आहे. श्रीमंताच्या पैशावर गरीबांच्या अडचणी दूर झाल्या पाहिजेत अशी समाजाचीच योजना आहे. पण गरीबा बरोबर इतर इस्टेटवाल्या मंडळीनें फुकट औषध नेलें तर त्यांत कांहीं कमीपणा आह्मास दिसत नाहीं निराळा कर वार्षिक फीच्या रूपानें बसविण्याची कांहीं अवश्यकता दृश्यमान नाहीं. जो पर्यंत सरकार आपल्या वाढत्या उत्पन्नांतून धर्मार्थ दवाखान्याच्या व्यवस्थेकडे निराळा फंड अधीक देत नाहीं तों पर्यंत वार्षिक फी हा अनिवार्य कर ह्मणून दिलाच पाहिजे पण निदान वर्गण्या लोकांनीं दिल्या नाहींत तर त्याचें आह्मास कांहीं नवल वाटत नाहीं.

वऱ्हाड प्रांतिक सभा भरून आज दोन वर्षें होत आलीं. हा घाट जमवून आणण्याचें श्रेय आमचे येथील पुढाऱ्यांनीं प्रथम घेतले परंतु आरंभ शूराः या कवीवाक्याची सत्यता होते कीं काय ही आह्मास भीति वाटूं लागली आहे. उमरावतीस गुदस्त सालीं अशा प्रकारची सभा भरवावी ह्मणून वाटाघाट चालली होती परंतु कांहीं कारणामुळें तो बेत रहित झाला. व अद्याप पर्यंत आमचे पुढाऱ्यांची सदरहू बाबतींत कांहींच हालचाल दिसत नाहीं हें आश्चर्य आहे! तरी मंडळी आतां निद्रितावस्थेंत न राहतां लवकरच आपल्या कामास लागतील अशी आह्मास बळकट उमेद आहे. मात्र गेल्या सभेप्रमाणें बाजार बुणग्यांची गर्दी जमविण्यापेक्षां निवडणुकीचे तत्वावर गांववार अगर तालुकवार मुखत्यारांस फक्त बोलाविण्यांत येऊन सभेपुढें विषय प्रांताच्या हिताचेच फक्त ठेवण्यांत येऊन त्यांचें उत्तम रीतीनें प्रतिपादन करण्याची तजवीज व्हावी. प्रांतिक सभेची सध्या फार जरूर आहे. व अशा प्रकारच्या संस्थेपासून प्रांतांतील लोकांचें एक एकमेकाशीं वळण वळण वाढून एकमेकांचीं

सुख दुःखें कळून एकंदरीत प्रांताचे हिता करितां काय काय गोष्टी केल्या पाहिजेत या विषयीं बरीच कल्पना करितां येईल व सरकारासही राज्यकारभारांत एक प्रकारची मदत होईल.

The Berar Samachar

MONDAY SEPTEMBER 14 1896

All light comes from the east but when it extends to the west it returns again with equal brilliancy to the original east. This is true of Nature, and the parallel holds good in the sphere of civilization as well. Asia was the central seat of knowledge and has lent all its civilization to the continents of the West. India has no doubt supplied the western nations with a fountain-head of civilization but in the dismal political revolutions that followed, our country lost its prestige and had in course of time to borrow knowledge, science and all other departments of knowledge from the West. England is indeed wielding the destinies of the Indian millions and the moulding of this vast nationality has been the noblest triumph of the British civilization. Anglocize India, is the motto of the west but the question is whether the transition will ever be complete or India will assert its old predominence in all branches of science and knowledge. India has not adapted herself to the changes that are coming over her but she is as well inert and helpless to dazzle nations with her riches in the paths of progress and reform. The history of Japan will however suggest a solution of the question. Japan is at present an eastern nation of parliaments and the material progress which that nation has made is in fact a marvel to the rest of the world. Japan has reached the highest top of glory in point of her material wealth. This material prosperity is the main cause of the rise of a nation. Without it, any nation will be shaken to its foundations. Japan is a foremost nation and India is not so. The result is there and it is the growth of the present century. When we try to explain why it is so we find that the foreign rule in India is what makes India differ in all essential points from Japan. The foreign rule has done immense good but the material prosperity of India is gradually sinking to a low level in spite of all the statistics o enormous figures of exports and imports. A nation will thrive tolerably well when it supplies its own wants from the manufactures of her own people. It cannot make a solid and substantial progress unless its goods find an easy market in the other notion. India is a large consuming nation. As a big customer she enriches the coffers of the manufacturing nations of the world. Let us not slip away the present and let us improve our material prospects. This is the only light which the histories of Great Britain and Japan throw upon our path. If we prove false to the light we shall never form a nation.

The Forest department in Berar is a paying concern and has within its gifts a number of lucrative and enviable salaries. We are of opinion that those who go successfully through a course of training in Forestry in the Imperial Forest school at Dehra Dun have prior and superior claims to the various posts in that department. The wonder is that no student from Berar attends that school in the Punjab. The long distance is no doubt calculated to hold back students of any solid worth from trying the course in forestry. The second reason is that many people are in total ignorance of such a school and of the prospects of the *special* training thereof. The Local Government is also lukewarm or rather sluggish to induce students to take up that course. We think that the Local Government is expected to carry out the intentions of the Imperial Government which one could well gather from their report of the school of the last year. We beg to draw the attention of the Educational Director to move in the matter and to see what facilities and attractions he could promise to the young generation under his general control.

"There are indeed parts of India in which it is still impossible to procure suitable local candidates for training in the Forest School without the promise of stipends and a guarantee of employment if the student qualifies. The prospects are not sufficiently attractive, or are insufficiently known, or the School is too remote. Where such conditions obtain, the necessity of the case must prevail; but even under these circumstances it is obviously desirable that the selected local candidates should have had some training in the forests to test their fitness and liking for the practical work of the forests before they are sent to the School. But where such conditions do not obtain the Government of India think that the Local Government should preserve to itself an absolutely free hand in the selection of those students who appear to be best fitted for the work to be done, without regard to whether they are stipendiaries or not and that whenever in such provinces a stipend is granted, it should be explicitly stated that the grant conveys no sort of promise or pledge of employment."

The forest-revenue shows a fall-off in 1894—95 in the main articles of produce. A full explanation is rendered about the causes that led to the decrease of revenue in the following remark on the gross yield and out—turn of forest produce:—

"First we have in the "C" forests in all taluks save the Melghat increased free exports of timber ane fuel by the village holders of concessions. In the past three years steps have everywhere been taken to make clear to all concerned the extent of the forest concessions given, and that these concessions are more widely taken advantage of is made clear by the fall off in passes issued by head men of villages, while it was especially noticed in the experimental opening of revenue stations (nakas) in Basim, where free forest procudce formed such a large proportion of what passed along each route as to render prohibitive the cost of collection of the price of paying produce by this system. Second, the transfer of the credit of the sale of trees on lands available for cultivation (formerly unreserved forests) from Forest to Land Revenue has affected the forest receipts in Basim considerably, though it has of course caused no loss to provincial revenue Third the demand for the timber and fuel from reserved trees in State-forests "C" was very slack durinɡ the last five months of the year, and though the earlier sales of considerable amounts at fair rates made this less felt than it would have otherwise been, it was one cause of the fall.

Fourth, and specially in connection with the short sales from the Melghat State forests C iii which amounted to—

Timber and fuel...241,288 cubic feet, valued at Rs. 13,078.

Bamboos... 172,6000 cubic feet, valued at Rs. 2,883.

The main cause was undoubtedly the bad harvest combined with a 25 o/o fall in the price of a cotton crop some 33 o/o below the average thus reducing the funds available for building and affecting every wood mart in Ellichpur and Akola whence supplies for timber and bamboos for other districts are drawn. This was the view put forward by all concerned with the trade, and is one strongly borne out by the very marked fall in the Berar excise revenue, which in the two adjacent districts alone amounted to Rs. 53,775. The fall in grass outturn was due to the heavy crop of jowari stalks (khurbi), as this crop ran to stalk and not to ear owing to the late rains, and also to the heavy grass crop all over the the country, which reduced the demand for grass from State-forests "A" and "B" in every district.,,

---

The last number of India contains a drastic paragraph about the plague of militarism. The note is remarkable for its succinct summary of revenue—figures and calls upon the reader to reecho the view with a redoubled force. The learned editor remarks thus:—

"The deplorable position of the finances, with the true causes of depletion, has been fully exposed and commented on in these columns. Land revenue, Forest, and Registration are the only heads of revenue that show a decrease. The Land Revenue, in spite of official exertions, went down Rx. 206,128. "On the whole," we are told, 'the tendency of the land revenue is to increase gradually and slowly:" in the past generation it has been increasing at the rate of about a million every five years. But this increase is partly due to territorial extention, as in the case of Upper Burma; and there is an ominous lack of elasticity in this, by far the most important, source of revenue. In Bengal, there were in the year under notice 1,466 sales of land for arrears, the estates being mostly small and of little value. The relations of landlord and tenant were "strained in particular localities, owing to the levy of illegal cesses by landholders, the illegal enhancement of rents, no-rent combinations among tenants, exorbitant exactions by landholders," and so forth. The Bengal Tenancy Act "continues to work smoothly;" but the number of suits under the Rent Tenancy Law has gone up to 238,399, a strong and steady increase. In the North-West Provinces, the coercive processes rose from 71,000 to 75,000; the attachments of property for arrears, from 7,016 to 9,642, though the sales of defaulters' property went down from 354 to 336. "The number of suits and applications under the rent law was 271,592 or 3 per cent, above the total of 1892-93, and was larger than in any previous year. Of the suits, over 90 per cent were, as in previous years, for arrears of rent." Similar statements are made in respect of the other provinces—except Madras, whose figures have attained a special interest. The euphemistic "coercive process," we may note, was in special request in fertile Berar. There, we learn, "the number of coercive processes issued against defaulters showed an increase, there having issued 15,638 writs of demand against 10,324 in the previous year; in 46 cases, personal property was sold for arrears 298 fields were also sold; but no defaulters were sent to prison." An increase of over 50 per cent. is indeed, an increase! And this in fertile Berar. We are sick of customs and excise, as well as of the salt tax. The impression remains that in spite of the large figures and the multifarious business recorded in this Blue book, the community is *not* doing well—not anything like so well as it might do. The sources of hindrance and mischief are hidden away under a smooth and smiling surface of cheerful figures. It is alike useless to ban or to entreat. But the first step towards a satisfactory administration is the abandonment of military enterprise and the release of the official energies for internal oversight and direction."

वऱ्हाड

हवामान—हवा स्वच्छ आहे. आतां पाऊस पाहिजे आणि हवेंत उष्मा होतो व मध्यंतरीं क्वचित् क्वचित ढगही ओसरतो त्यावरून लवकरच चांगला पाऊस पडेल असा अदमास आहे. रोगराई सध्या नाहीं. पीकें मध्यम स्थितींत आहेत.

रा० रा० कृष्णराव पुरुषोत्तम भट, बी० ए० एल० एल० बी० हे पुण्याहून कांहीं कार्या निमित्त वऱ्हाडांत आले होते. हे आज रोजीं दिवसाच्या गाडीनें येथील मित्रमंडळीस भेटून परत पुण्यास जाणार आहेत.

मि० बुलक साहेब कमिशनर हे बुलढाण्याकडे वार्षिक तपासणी साठीं गेले आहेत. ते आज उद्यां परत उमरावतीस जाणार आहेत.

क्याप्टन हार्सबरो असि. कमिशनर, उमरावती हे वर्षभराच्या फर्लो रजेवर जाण्याच्या बेतांत आहेत असें कळतें.

फटके मारण्याची शिक्षा देण्याचा अधिकार मि. जे. आर. एडवर्ड एक्स्ट्रा असि. कमिशनर व माजिस्ट्रेट वर्ग २ उमरावती यांस देण्यांत आला आहे.

लेफटेनंट डी. ओ. मारिस, असि. कमिशनर यांस खामगांव मुनसिपालिटीचे अध्यक्ष निवडण्यांत आले.

रा. रा. जोतींद्र मोहनराय, असिस्टंट इंजिनिअर यास चालू महिन्यापासून २ महिने १० दिवस या मुदतीची हक्काची रजा देण्यांत आली आहे.

प्राणी मेला कीं सर्व व्याप सुटला. रावसाहेब मारुती कडताजी पाटील, स्पेशल माजिस्ट्रेट, शेगांव यांनीं एकाएकीं यमदरबारचा रस्ता धरला आणि गेल्या शनिवार पासून शेगांवकर अखेरचे कटू उद्गार काढून स्तब्ध झाले.

वर्तमानसार.

बार्लिन येथील प्रसिद्ध शास्त्रशोधक डाक्तर सिनेना यांचें घर म्हणजे सौदामिनीचें वास्तव्यस्थानच बनलेलें आहे असें म्हटलें तरी चालेल. त्यांच्या घरांत सर्वत्र विद्युच्छक्तीनें कामें होतात. झाडलोट, बिछाने पसरणें, भोजनाची सिद्धता, भोजन टेबलावर आणणें, दिवे- बत्ती, धुणें पाणी, वांसणें पुसणें, वगैरे यच्चयावत् गृहकृत्यें विजेच्या यंत्रांनीं होतात, व ह्या प्रमाणें त्यांचे घरांत चोहोंकडे वीजच संचार करीत असलेली बघण्यांत कोणालाही अतिशय कौतुकाश्चर्य वाटल्यावांचून राहात नाहीं.

तोंडांत साप !–कसबा सादोरा हा गांव नाहन (वायव्यप्रांत) शहरापासून १९ कोसांवर आहे. त्या ठिकाणीं एक मनुष्य खिरे [काकड्या] खाऊन एका बागेंत निजला. कित्येकांस निजल्यावर तोंड उघडे ठेवून आ करून निजण्याची संवय असते, त्या प्रमाणें ह्या बागेंत निजलेल्या मनुष्यासही तोंड वासून निजण्याची संवय होती. तो निजल्यावर त्याचें तोंड एक बीळच आहे असें समजून एक साप त्या तोंडांत शिरला. तो चांगला त्याचे घशांत गेल्यावर झोंपलेला मनुष्य जागा होऊन ओरडूं लागला. त्यास त्यानें नीट ओरडवेना देखील. त्याचेजवळ पुष्कळ मंडळी जमली त्यांनीं त्या सर्पास बाहेर काढण्याचा पुष्कळ यत्न केला. पण तो साप मुळींच बाहेर निघेना अर्धा साप तोंडांत गेला व अर्धा बाहेर राहिला. आणि त्या बाहेर राहिलेल्या भागानें त्यानें त्या दुर्दैवी माणसाच्या गळ्याला विळखा घातला होता. त्या सापापासून त्या मनुष्याची सुटका करण्याचा सर्व प्रकारें यत्न केला. परंतु तो व्यर्थ झाला. पुढें त्या मनुष्याची काय दशा झांली ती समजली नाहीं. ज्ञा. प्र.

जपानानें नवीन तऱ्हेची पोष्ट कार्ड तयार केली आहे. या कार्डावर टिकिटाचा जो छाप आहे तो चीनाबरोबर लढाईत जपानानें जो नुकताच जय मिळविला त्याचा दर्शक असा तयार केलेला आहे जपानानें मिळविलेल्या विजयाची सर्व जपानी लोकांस वारंवार आठवण व्हावी या करितां ही व्यवस्था केलेली आहे. हीं कार्डें दोन जातीचीं आहेत. एक दोन दिडक्याचे (जपानी नाणें सेन) व दुसरे ५ दिडक्यांचें. दोन्ही कार्डांचे आकार व रंग वेगळे असून त्यांवर जपानी विजयाचा जो देखावा दाखविला आहे तो फारच सुंदर असल्यामुळें त्या कारागिरीबद्दल युरोपियनही जपान्यांची तारीफ करीत आहेत. सध्या २ दिडक्यांची कार्डें ५०,००,००० तयार केली असून पांच दिडक्यांची २०,००,००० केली आहेत. पोष्टाच्या कार्डावर आपल्या विजयाचा देखावा दाखविण्याची जपानी लोकांची ही कल्पना पाहून युरोपियन लोकही चकित होत आहेत.

वकिलांस बारिस्टराचे झगे घालण्याची परवानगी देतां येत नाहीं, तरी दुसरी एखादी तऱ्हा सूचवाल तर विचार करूं असें कलकत्ता हायकोर्टाच्या चीफ जस्टीसनें ह्या कोर्टाच्या वकिलांच्या अर्जास उत्तर दिलें.

√ आपल्या हक्काविषयीं दक्ष असा नेटिव भेटला म्हणजे गोऱ्यांचे अरेरावी वर्तनाचा फारसा उपयोग होत नाहीं. इ. आय. रेलवेच्या भारत नाहन स्टेशनावर एक अशा प्रकारची गोष्ट नुकतीच घडून आली ती हकीकत अशीः—तेथील एक यूरोपियन जाइंट म्याजिस्ट्रेट दोन महिन्यांची रजा घेऊन परगांवीं जाण्यासाठीं रेलवे स्टेशनावर येऊन पहिल्या वर्गाचे डब्यापाशीं गेले. तों त्यानें एक मुसलमान व त्याची बायको अशीं आंत बसलीं आहेत असें पाहिलें. नेहमींप्रमाणें त्यानें त्या उभयतांस दुसऱ्या डब्यांत जाऊन बसण्यास सांगितलें. पण सदर्हू मुसलमान गृहस्थ हे कायदेपंडित असल्यामुळें त्यांनीं साहेब बहादुरांचें म्हणणें मुळींच जुमानिलें नाहीं तेव्हां म्याजिस्ट्रेट साहेबांनीं स्टेशन मास्तराकडे धांव घेतली व त्यास त्यांनीं सदर्हू पहिल्या वर्गाचा डबा खुला करून देण्यास सांगितलें. त्याप्रमाणें मास्तर साहेबही डब्यापाशीं जाऊन सदर्हू युरोपियन गृहस्थ म्यजिस्ट्रेट आहेत तेव्हां आपली जागा सोडून देण्याविषयीं त्यानें मुसलमान गृहस्थास सांगितलें. मुसलमान गृहस्थानें शांतपणें स्टेशन मास्तरास असें उत्तर दिलें कीं, ते यूरोपियन गृहस्थ म्याजिस्ट्रेट असोत किंवा प्रत्यक्ष गव्हर्नर साहेब असोत. आपण आपली जागा सोडण्यास तयार नाहीं. मुसलमान गृहस्थाच्या तोंडून निघालेले हे शब्द ऐकून त्या यूरोपियन म्याजिस्ट्रेटांनीं विचार न करितां एकदम त्या मुसलमानावर हात टाकला पण मुसलमान गृहस्थही स्वस्थ न बसतां आपलें संरक्षण करूं लागले. त्या झटापटींत साहेब प्लाटफॉर्मवर उताणे पडले. त्याबरोबर साहेबांच्या डोळ्यावरील धुंदी एकदम उतरली व ते जरासे शुद्धीवर आले तेव्हां त्या मुसलमान गृहस्थानीं आपण बारिस्टर असून आपले बंधू डिस्ट्रिक्ट जज्ज आहेत असें त्या गोऱ्यास समजून सांगितलें तेव्हां यूरोपियन म्याजिस्ट्रेट साहेब खजील होऊन मुकाट्यानें दुसऱ्या डब्यांत जाऊन बसले. या हकीकतीवरून वांचकांनीं एवढीच गोष्ट लक्षांत घ्यावयाची कीं आपल्या कायदेशीर हक्कांचें योग्य रीतीनें संरक्षण करण्याचें नेटिव लोक जों जों मनावर घेतील तों तों त्याजवर होणारे जुलूम कमी होत जातील आणि कायदेशीर हक्कांच्या संरक्षणार्थ दृढ अंतःकरणानें नेटिव लोक झटतात असें दिसूं लागलें म्हणजे राज्यकर्ते ही नेटिवांचा योग्य मान ठेविल्या शिवाय खचित राहाणार नाहींत.

बंगाल्यांतील बाकरगंज जिल्ह्यांत ता. १ सपटंबर पासून हत्यारांचे परवाने देण्याचे बंद करण्याचा हुकूम बंगाल सरकारनें केला आहे. त्या जिल्ह्यांतील लोक बंडखोर झाले असें कारण सरकारानें पुढें केलें आहे.

गेल्या सहा-माहींत हिंदुस्थानांतील रेल्वेंत अपघातानें २६४ प्रवाशी मेले व १८४ जखमी झाले. तसेंच रेल्वेपैकीं ७८ नोकर अपघातानें मेले व १९६ जखमी झाले. एकंदर ७३३७७९३२ प्रवासी रल्वेंत बसले व नऊ वेळां गाड्यांच्या टकरा झाल्या.

निजाम सरकारचे गुरू मौलवी मिस्किनरहा हे २४ आगष्ट रोजीं मरण पावले. यांचें वय ११८ वर्षांचें होतें. सुमारें अर्ध्या हैद्राबादचे लोक यांचे शिष्य आहेत. यांच्या स्मशानयात्रेस सुमारें ९० हजार लोक जमले होते. यांचें ९।१० वर्षापूर्वीं लग्न झालें असून त्यांनां ७।८ वर्षाचा मुलगा झालेला आहे. असें गु. स. वरून कळतें.

महाड तालुक्या पैकीं एका गांवीं एक डोंगर कोसळून त्या खालीं नुकतीच वीस मनुष्यें ठार झालीं.

सध्यां जपान येथें दुष्काळ पडल्यामुळें त्या सरकारानें एक खास हुकूम प्रसिद्ध केला आहे कीं, सरकार जवळून लेखी परवाना घेऊन पाहिजे त्या कुटुंबानें आपल्या मुली विकाव्यात.

जपानच्या ईशान्य भागांत पुन्हा धरणीकंप होऊन एक शहर गडप झालें व कित्येक शहरांची नासाडी झाली.

हल्लीं बहुतेक ठिकाणीं पावसानें ओढ दिल्यामुळें लोक फिकिरींत आहेत.

चामडें कमावून तें तयार करणारी एक कंपनी नुकतीच बऱ्हाणपूर येथें सुरू झाली आहे. क. त.

उज्जनी येथें एका स्त्रीची विलक्षण तऱ्हेनें सुटका झाली. इंदूरहून दोन गृहस्थ तिजकडे येऊन त्यांनीं तिच्या आईबापांस कळविलें कीं तिचा नवरा कालऱ्यामुळें आजारी असल्यामुळें तिला घरीं नेण्यास आपणांस पाठविलें आहे तरी तिला आमच्या बरोबर रवाना करावें. जामाताची अशी दुर्वार्ता ऐकून मुलाचीं आईबापें दुःखी होऊन त्यांनीं त्या गृहस्थांबरोबर मुलीस अर्भकासह पतिगृहीं पाठविलें. त्यांजबरोबर आणखी कोणी इसम तीं घरून पाठविण्याच्या बेतांत होतीं, परंतु सदर गृहस्थ मुलीच्या परिचयाचे व शेजारींच राहणार असल्यामुळें मुलीनें एकटेंच जाण्याचें कबूल केलें व त्या प्रमाणें तिची बोळवण करण्यांत आली. बरेच लांब गेल्यावर इंदूरच्या जवळच एका निर्जन प्रदेशांत मंडळी येऊन पोंचतांच त्या दोघां गृहस्थांस दुष्ट विचारांनीं घेरलें असल्यामुळें जवळच एक प्रचंड विहीर होती तींत त्या स्त्रीस व अर्भकास लोटून देण्याचा बेत करून व उभयतांस दोरखंडानें जखडून टाकून त्यांच्या गळ्यास मोठी धोंड बांधण्यास आणावयाकरितां ते अधम गेले. देव दीनाचा साह्यकारी आहेच! एक मोठा धोंडा पाहून तो जमिनींतून उखळून काढण्याचा ते दुष्ट प्रयत्न करीत असतां अकस्मात् त्या दगडाखालून एक अगडबंब कृष्णसर्प मोठ्या त्वेषानें बाहेर आला व दोघांसही त्यानें आपल्या विस्तृत अशा देहाचे विळखे घातले व त्यांचा निरुपाय करून टाकला. नवल हें कीं तो त्यांस चावला नाहीं. इकडे ती स्त्री अर्भकासह बद्ध होतीच व ह्या दुष्टांसही तीच स्थिति या सर्पानें आणिली. बराच वेळ गेल्यावर दुरून कांहीं घोडेस्वार त्या रस्त्यानें जात होते त्यांनीं हा चमत्कार पाहून प्रथम त्या स्त्रीची व अर्भकाची सुटका करून तीस सर्व वर्तमान विचारितां तिनें सर्व कच्ची हकीगत सांगितल्याबरोबर त्यांच्या अंगावर शहारे उभे राहून त्या दुष्टांचा समाचार घेण्याचा त्यांनीं निश्चय केला, परंतु त्या सर्पापासून त्यांची सुटका होईपर्यंत त्यांचा निरुपाय झाला. कांहीं केल्या तो त्यांस सोडीचना. शेवटीं त्या स्त्रीनें दीनवदन करून हात जोडून प्रार्थना करितांच त्या दुष्टास त्या उदार सर्पानें मोकळें केलें व पुन्हां दगडाखालील बिळांत गमन केलें. इकडे त्या स्वारांनीं त्या अधमांचा यथास्थित समाचार घेऊन त्यांस चतुर्भुज करून इंदुरास नेलें. त्या स्त्रीचे बरेच दागिने त्यांनीं उपटले होते ते तीस परत देववून तिला सुखरूप पतिगृहीं पोंचविलें. पतीस कांहीं दुखणेंबाणें झालें नव्हतें असें ऐकून तीस त्या गृहस्थांची किंमत पूर्णपणें कळून आली. भक्तांचें संकट हरण करण्याकरितां देव कोणत्या रूपानें अवतरतो हें अगम्य आहे. न्या.

एतद्देशीय व परकीय हस्त कौशल्याचे पदार्थांचें प्रदर्शन निझाम सरकारच्या राज्यांत चदरघांट येथें करण्याचें श्रेय मुंबईचे मि. बद्रद्दीन कूर, दिल्लीचे मि. हेमचंद्रराय यांनीं मिळविलें. हे प्रदर्शन गेले २१ वे तारखेस दिवाण नबाब सर व्हिकार उल उम्राबहादूर यांचे हातून खुलें करण्याचा समारंभ झाला. शु. सू.

यंदा संस्थान आउंध येथें गणपतीचे मेळ्यांत मुसलमानांचा एक मेळा तयार झाला आहे.

हिंगणीगाडा ता० भिमथडी येथील मारुतीस अतिशय घाम सुटल्याची बातमी वार्तानिधी देतात. खरेखोटें तपासून घ्यावें. म. मि.

सैदापेठच्या शेजारीं सौथ इंडियन रेल्वेवर आगगाडीस अपघात करण्याकरतां रस्त्यावर अडचण करून ठेवल्याचा एक प्रकार नुकताच आढळला. हें ज्याणे केलें त्यास पकडून त्याच्याबर खटला झाला व त्यांस शिक्षाही झाली. खटल्याच्या चवकशींत तूं असें कां केलेंस असें जेव्हां विचारण्यांत आलें तेव्हां त्याणें फार मासलेदार जबाब दिला. तो म्हणाला या रेलवेकरतां माझी जमीन घेतली असून त्याबद्दल कांपनसेशनची योग्य किंमत मला दिली नाहीं म्हणून मी असें केलें !

हिंदु आयेन शोध ह्या नावाचें साक्लोपेडिया सारखें एक पुस्तक ट्रनबर नांवाचा एक साहेब प्रसिद्ध करण्याच्या तयारींत आहे. यांत हिंदुस्थानांतल्या सर्व भाषा, धर्म इतिहास, कलाकुशलता या सर्वांचा क्रमानें भरणा व्हावयाचा आहे. अमेरिका, इंग्लंड जर्मनी, आस्त्रिया, नेदरलांड व हिंदुस्थान यांतले मिळून तिसापेक्षां जास्त इतके निवडक शास्त्री हें पुस्तक तयार करण्याच्या कामावर लागले आहेत. या पुस्तकाचा तिसरा भाग इंग्रजींत व्हावयाचा असून बाकीचे दोन भाग जर्मन भाषेंत व्हावयाचे आहेत. वेदिक व संस्कृत लिपी, इंडियन वर्णोच्चार, न्याय व रीति, व बौधपंथ इतके भाग तयारही झाले आहेत.

अरुणोदय.

☞ हें पत्र आकोला येथें कै० वा० खंडेराव बाळाजी फडके यांचे " वऱ्हाडसमाचार " छापखान्यांत नारायण खंडेराव फडके यांनीं छापून प्रसिद्ध केलें.

साल अखेर ,, ७ ,, १ ०८
किरकोळ अंकास ०४

Six monthly......... 3 ...., 8 as
Single copy .... 4 as

नोटिशी बद्दल
१० ओळींचे आंत रु० १
दर ओळीस ०१ ०६
दुसरे खेपेस ०१

वऱ्हाडसमाचार.

Advertisement.
Below 10 lines ... 2 Rs
Per line over 10 ... 4 as.
Repetition Per ine ...3 as

THE BERAR SAMACHAR

VOL XXX — AKOLA MONDAY 21 SEPTEMBER 1896 — NO 37

वर्ष ३० — आकोला सोमवार तारीख २१ माहे सप्टेंबर सन १८९६ इ० — अंक ३७

मुंबई बँकची ठेव ठेवण्याची बँक.

या सेव्हिंग बँक मध्यें खालील अटीवर ठेव ठेविली जाईल.

कोणत्याही एका वर्षांत ह्मणजे जानेवारीच्या १ ले तारखे पासून तो दिसेंबरच्या ३१ तारखे पर्यंत फक्त एक हजारा पर्यंत रुपये ठेविले जातील.

दोन अथवा अधिक मनुष्यांच्या नांवांनें देखील एक ठेव ठेविता येईल. व त्यांच्या हयातीत, तसेंच त्यांचे पैकीं कोणी वारले तर त्यांचे मागें त्यांच्या पैकीं एकास अथवा अधिक जणांस ठेव काढतां येईल.

एका वर्षांत एक हजार रुपया पर्यंत ठेवलेल्या रकमेवर दरसाल दर शेंकडा ३ दोन रुपये व्याज दिलें जाईल. मात्र ५००० पांच हजारा वरील रकमेस व्याज नाहीं.

मुंबई ब्यांक
आकोला १०।७।९६. } R. Aitken
Agent

नमुना नंबर १४२

दिवाणी कोर्टास सूचना

अज्ञानाच्या मालमिळकतीच्या वहिवाटीचें सरटीफिकीट मिळण्या विषयीं अथवा अज्ञानाचे पालन व त्याच्या मालमिळकतीचा कबजा करण्या लायक मनुष्य नेमण्या विषयीं सन १८९० चा अक्ट ८ कलम ६ प्रमाणें.

दि. क्री. मुा. चा नंबर ३ सन १८९६

डि० क० साहेब जिल्हा इलिचपूर यांचे कोर्टांत.

अर्जदार–नऱ्हाजी
बापाचें नांव–देवमन
जात–कुणबी
राहणार–भीलोन ता. इलिचपूर जिल्हा एलिचपूर यानें.

(अज्ञान) राजाराम वा. उकर्डा जात कुणबी राहणार भीलोन ता. एलिचपूर जि. एलिचपूर याच्या माल मिळकतीच्या वहिवाटीचे सरटीफिकीट मिळावे ह्मणून अर्ज दिला आहे. यास्तव मृत्युपत्राचे आधारें किंवा दस्तऐवजावरून, किंवा अगदीं जवळचे नातलगपणाचे कारणावरून, किंवा इतर प्रकारें ज्या कोणी मनुष्यास सदरहू अज्ञानाचे मालमिळकतीवर सांभाळकर्ता या नात्यानें कबज्या करण्या चा हक्क सांगावयाचा असेल त्या सर्वांस या लेखानें कळविण्यांत येत आहे कीं त्यांनीं तारीख २९ माहे ९ सन १८९६ इसवी रोजीं वरील अर्जाची चौकशी होणार आहे ते वेळीं ह्या कोर्टांत तेथें हजर होऊन आपापल्या हक्काची लेखी हकिगत दाखल करावी. तारीख २९ माहे ८ सन १८९६ इसवी.

H. Godwin Austen
Deputy Commissioner
Ellichpur.

नमुना नंबर १४३

कोणी स्थानापन्न होतो तेव्हां त्यांस कर्ज वसूल करितां येण्यासाठीं सरटीफिकीट मिळावें ह्मणून त्यानें जिल्हे कोर्टास अर्ज केल्या विषयीं जाहिरात.

सन १८८९ चा अक्ट ७ प्रमाणें.

दि. कि. मु. नंबर ९ वर्ग १९
९६

डेपुटी कामशनर साहेब जिल्हा एलिचपूर यांचे कोर्टांत.

नांव— सिताराम वा. नागाजी
जात – कुणबी
राहणार—चवसाळ तालुके दर्यापूर
जिल्हा—इलिचपूर यांस मयत

आकाराम बापाचे नांव नागाजी जात कुणबी राहणार चवसाळ तालुके दर्यापूर जिल्हा इलिचपूर यांचें कर्ज वसूल करितां येण्यासाठीं सरटीफिकीट मिळोंवं ह्मणून सदरहू अर्जदार यानें अर्ज केला आहे त्याजकरितां सदरहू मयत मनुष्याचे माल मिळकतीवर किंवा तिचे कांहीं भागावर आपला हक्क आहे ह्मणून ज्या मनुष्यांचा दावा असेल त्यास जाहिरातीचे द्वारें कळविण्यांत येत आहे कीं, त्यांनीं तारीख २९ माहे सपटेंबर सन १८९६ इसवी रोजीं सदरहू अर्जाची चौकशी होईल त्यावेळी या कोर्टांत हजर होऊन आपआपले हक्का विषयीं लेखी हकीकत दाखल करावी.

तारीख २९ माहे ८ सन १८९६ इसवी.

H. Godwin Austen
Deputy Commissioner
Ellichpur

जडज्य

॥ ओवी ॥

॥ श्री सद्गुरु स्तोत्र ॥

अगा प्रणतवत्सला । निज जनाखिल-मंगला । कलितकाल कौतूहला । आद्यबीजा ॥१। दुरितांबुद प्रभंजना, । सज्जन मन रंजना. । भय कृद्वयनाशना । पूर्णानंदा । २ । अज्ञान काननो च्छेदका । किल्मिष कुलाद्री भेदका । त्रिभुवन प्रतिपालका । प्रणवरूपा। ३ भक्त-काम-कल्पद्रमा । मंगल धामा, । उत्तमोत्तमा । निष्कलंका, निष्कामा । पुण्यवंता।४ तूं पावनाचें पावन, । तूं शोभनाचें शोभन, । तूं मंडणाचें मंडण अद्वय तूं । ५ । तूं क्षेत्रपाळ समर्थ । न कळे वेदासही अंत । तूं मार्तंड तेजोवंत, । अविद्या हननीं । ६ । अगा ! नारायण सरस्वती । तूं निश्चळ ब्रह्ममूर्ति । पयः फेन-धवल कीर्ति । तुझी आहे । ७ । ××× चा नंदन । ज्याचें नांव ×-×× । तो अत्यंत लीन होऊन । पाउलें वंदी । ८ । तूं आमचा शिव आणि शक्ती । सकल देव देवतांची पंक्ति । तूंचि आह्मा । ९ । पुण्य पवित्र तीर्थावलि । वास करी तुझ्या पाउलीं । कृपा छत्राची साउली । आह्मा तुझी । १० । तुझ्या पायाचे किंकर । आह्मी आहोंत साचार । तुजविण अन्य आधार । आह्मा नाहीं । ११ चतुर्दश भुवना व्यापून । शेष उरलेलें निरंजन । जें अखंड दंडायमान । तत्वमसि। १२ “ परब्रह्मा पुराणपुरुषा, भो निर्गुणा शून्यवेषा । निर्विकारा, परेशा, । अनामिका.। १३ अकुला, अजाता, निराकारा । भो अजन्मा, शून्यांतरा । मायारहिता, परात्परा, । अनिर्वाच्या । १४ । अगा कारुण्य सागरा । शरच्चंद्र मनोहरा । दयामृतपयोधरा । कल्पवृक्षा ” । १५ । हीं लौकिक विशेषणें । तुज देणें अश्लाघ्यवाणें । कांहींची विशदी करणें । ऐक बापा. १६ ब्रह्मीं कर्तृत्व नाहीं, । नताभिमान त्यास नाहीं, । पौरुष अंगीं नाहीं, । ऐसें ब्रह्म. १७ अनंत युगायुगाचा, । ह्मणून जरठ झाला साचा, । जरठास बुद्धीचा, । अभाव असे १८ गुण नाहीं तो निर्गुण, । त्याचा जन्म पशु समान, । निर्गुणास मान्यता कोण, । सांगा देई ? १९ शून्य वेष ह्मणजे कांहीं । वेष ज्याला कोणता नाहीं, । तूं तो अनंत वेषा पाही, । शून्य वेष कैसा ? २० निर्विकारास लज्जा नाहीं । निर्विकारास भीड नाहीं निर्विकारास जाणीव नाहीं, । पाषाण जैसा. २१ अकुलास कुल नाहीं, । अनामिकास जातं नाहीं, । शून्यांतरास काळीज नाहीं, । मैंद जैसा. २२ पाहून परदुःखास, । माया येईना ज्यास, । ऐशा मायारहितास, । धिक्कार असो. २३ मर्यादा उल्लंघनार्थ । सागर आहे असमर्थ, । क्षारता अत्यंत । उदकीं आहे. २४ शरदृतूचा शशिकर । चंद्रिका वर्षे मनोहर, । तृप्त होती फक्त चकोर, । एक देशी असा तो. २५ पयोधरास वारा, । उडवीं सैरावैरा, । कल्पित वृक्षास थारा सत्याचा नाहीं. २६ हीं असलीं संबोधनें, । अनंत ज्यांत कुलक्षणें, । तीं तुजला देणें, । योग्य काय ? २७ सत्ताधीश, कर्तृत्ववान, । नताविषयीं साभिमान, । तूं अत्यंत सामर्थ्यवान, । आहेस बापा. २८ जरी तूं युगायुगांचा । तरी बुद्धिवैभवांचा । पारावार नाहीं साचा । बुद्धि दाता तूं २९ तूं षड्गुण संपूर्ण । निर्गुणी ह्मणेल कोण ? कलाविद्यांचें अधिष्ठान । तुझे ठाई. ३० तूं नाहींस निर्विकार । चित्तीं कोमलता फार । जाणीव कलेस आधार । आहे तुझा ३१ तूं कल्पनेचा नाहींस वृक्ष । प्रगट आहेस प्रत्यक्ष । स्वसंवेद्य अंतरसाक्ष । आहेस तूं ३२ तूं सच्चिदानंद धाम । तूं आहेस निष्काम । निष्कामापेक्षां पूर्ण काम । ह्मणणें अधिक युक्त ३३ निष्काम शब्दाचा, यौगिक अर्थ पाहतां याचा । शोध घेतां ब्रह्मांडाचा । ऐसा न कोणी ३४ निष्काम झाल्यावर । अवघाच खुंटला व्यापार । व्यापार खुंटता शरीर । उरेल कैचे ३५ उत्पत्ति स्थिति आणि लय । हें निष्कामाचें लक्षण काय ? निष्काम होण्यास उपाय । अन्य नाहीं. ३६ निष्काम एक ब्रह्म साचार । तें होण्यास टाकावें लागे शरीर । अथवा विचारप्रलय झाल्यावर । ब्रह्म होईजे. ३७ हे दोन प्रकार । रामदास योगेश्वर । ग्रंथ दासबोध सुंदर । त्यांत बोलिला. ३८ विचार प्रलय झाल्यावर । ब्रह्म होता नर । "हा रामदासाचा विचार मज मान्य नाहीं. ३९ करून अकर्ता ह्मणणें । हीं तों फजीतीची लक्षणें । ऐसें निभ्रांत माझ्या मनें घेतलें आहे. ॥४०॥ भजन पूजन अर्चन । ब्रह्म चिंतन आत्म निवेदन । निष्कामास काय कारण । यांचें सांगा ? ॥४१॥ ऐहिक अथवा पारमार्थिक। उन्नति होऊन व्हावें सार्थक । ऐसा काम धरितां साधक । सिद्ध होतो ॥४२॥ संत अथवा असो योगी । विरक्त अथवा असो भोगी । प्रथम कामना धरून अंगीं । पूर्ण काम होतो ॥४३॥ पूर्ण काम झाल्यावर । सुखें निष्काम ह्मणा तो नर । जैसे संतृप्ति नंतर । उपाशी ह्मणणें ॥४४॥ जे जे महात्मे होऊन गेले । ते प्रथम पूर्णकाम झाले । पूर्ण काम होतां निष्कामत्व आलें । अंगीं सहज ॥४५॥ आह्मी तों संसारी जन । अर्थ घेतला नाहीं साधून । तों निष्काम होऊन । कैसे राहोंव ? ॥ ६॥ आपल्या दर्शनाची । अथवा प्रसादाची । निष्कामास या वांच्छेची । गरज काय ? ॥४७॥ मी निष्काम नोहे । तूं माय माझी आहे । ह्मणून सोत्कंठें वाट पाहे । तव प्रसादाची ॥४८॥ अगा नारायण सरस्वती । तूं कनवाळू आहेस चित्तीं । तुझें नाम माझ्या मुखीं । अखंड आहे ॥४९॥ आमुची गरज तुला नोहे । परंतु आह्मास तुझी आहे । तुझी कास धरिली आहे । तार अथवा मार तूं ॥५०॥ माझा देवादि देव । तव चरणीं अनन्य भाव । असतां, “ मम केशव ” कां ह्मणाया लाविलें ? ॥५१॥ अव्यभिचारी पाहिजे भाव । हें गीतेंत बोलिला केशव । मग आह्मास अन्य ठाव । कां पहाया लाविशी ? ॥५२॥ व्यभिचार करायास । पतीनें निरोपिलें सतीस । तें करणें सदोष । कां निर्दोष हें सांगणें कठीण ॥५३॥ तुझ्या चरणाची आस धरून । सोत्कंठे आलों असतां धावून । तूं मजला दूर लोटून । दिलें आहेस ॥५४॥ विचार पाहतां चित्ती । तुझी कृपा मजवरती । नाहीं ऐसें गा कृपामूर्ति । वाटतें मला ॥५५॥ तूं दयेनें परिपूर्ण । असतां, निष्करुण । मज विषयीं मात्र कोठून । झालास ऐसा? ॥५६॥ कांहींच सेवा केली नाहीं । ह्मणतों कृपा कर कांहीं । ह्मणूनि तटस्थताही। धरिलीस काय? ॥५७॥ अथवा माझे दुर्दैव आलें । ते तुझ्या चरणी लागलें । त्यास अभय देऊन पाजिलें । पीयूष काय? ॥५८॥ अथवा तुह्मी संतजन । तुह्मा “ ओखटें गोमटें ” समान । मी आणि माझे कष्ट दारुण। सारखे तुह्मा ॥५९॥ तुह्मी समदृष्टी योगेश्वर

प्णूनि मजवर आणि कष्टांवर । सारखी
ृपेची पांखर । घातली काय! ॥६०॥ तूं
ाप आमुचा समर्थ । मग काळजी करावी
केमर्थ । हा चित्तीं दृढ धरुनि अर्थ । स्व-
थ आहे मी ॥ ६१ ॥
ूर्य उगवण्या आधीं । अरुण येतो जैसा
नभीं । अथवा राजागमन दुंदुभी । सुचवी
तैसें ॥ ६२ ॥ तैसें नेत्रस्फुरण झालें ।
आपलें येणें सूचित केलें । आतां आपुली
ाउलें । दिसतील केव्हां ॥ ६३ ॥ आपलें
घडावें दर्शन । ऐसें चिंती माझें मन । परंतु
ई करणें पूर्ण । आपणाकडे ॥६४॥

वऱ्हाडसमाचार

मिती भाद्रपद शुद्ध १४ शके १८१८

रा० रा० नारायण गणेश चंदावरकर बी. ए. एल. एल. बी., मुंबई यांनीं तेथील ुइलसन कालेजाच्या व्याख्यानमालेंत एक सुरस व्याख्यान दिलें. सामाजिक सुधारणे संबंधानें व्यक्तिमात्राची योग्यता किती आहे आणि त्याच्या हातून कोणकोणतीं कोर्यें संभवनीय आहेत या प्रश्नाचा विचार व्याख्यानांत फार उत्कृष्ठ रितीनें केला आहे. व्यक्तिमात्राची कल्पना त्याच्या समाजावरूनच खरी करिता येते. समाजापासून निराळी अशी व्यक्ती कल्पिली तर ती व्यक्ती आरिस्टाटल तत्ववेत्त्याच्या ह्मणण्या प्रमाणें एक ईश्वर ह्मणून मानली पाहिजे किंवा पशु ह्मणून तरी मानली पाहिजे. पूर्वीं कांहीं पंडितांची व्यक्तिमात्राविषयीं कल्पना ह्मणजे अशी होती कीं मनुष्य हा उपजत स्वतंत्र असून त्याचा दुसऱ्या माणसांशी किंवा समाजाशी कांहीं संबंधी संबंध नाहीं; आणि मनुष्यें स्वकीय हितासाठीं एकत्र झालीं आणि या एकत्रपणामुळें मनुष्याचा समाज बनला आहे. फ्रान्सची राज्यक्रांती झाली त्यावेळीं व्यक्तिमात्राचे स्तोम इतकें माजलें होतें कीं सामाजिक व्यवस्था व्यक्तिमात्राच्या स्वतंत्रेतेला बाधक ह्मणून त्या नाहींशा करण्याकडे लोकांचे विचार वळले होते. पण असे विचार परिणामीं चुकीचे आढळून आले. समाज ह्मणजे व्यक्तिरूपी परिमाणूंच्या संयोगानें बनलेला, एक निर्जीव पदार्थ आहे असा जो पूर्वीं समज होता तो आतां चुकीचा ठरला आहे. समाज ही एक सजीव संस्था आहे व मनुष्यमात्र तिचे घटकावयव असून त्यांचा अंतर्गत संघशक्तीच्या प्रेरणेनें परस्परांशी संबंध जडलेला आहे. तेव्हां भावार्थ हा कीं मनुष्यमात्र ज्या समाजाचा घटकावयव आहे त्या समाजाच्या संबंधानें मनुष्यमात्राचें अस्तित्व ओळखतां येतें आणि सामाजिक परिस्थिती लक्ष्यांत घेतली ह्मणजे त्या त्या व्यक्तीच्या आयुष्यक्रमाचें धोरणही त्यावरूनच ठरलें जातें. अर्थात व्यक्तिमात्राची योग्य कल्पना होण्यासाठीं आपणास त्याचें कूळ, जात, देश, धर्म व परंपरागत आलेल्या चाली रिती व समजूती इत्यादि गोष्टी चांगल्या ओळखून घेतल्या पाहिजेत ह्मणजे ज्या समाजांत मनुष्य जन्मला असेल त्यांतील वरील गोष्टींच्या साधनानें त्याचें व्यक्तित्व स्थापित करितां येईल.

समाजांतील प्रत्येक व्यक्तीमध्यें कांहीं अनुवांशिक संस्कार व परिस्थितीचे परिणाम दिसून येतात. समाजशास्त्रा प्रमाणें प्रत्येक राष्ट्राचा इतिहास व त्याचा नैसर्गिक स्थिती यांच्या परिणामाला अनुरूप असे गूण राष्ट्रांतील लोका मध्यें दृष्टीस पडत असतात. प्रत्येक व्यक्तीच्या गुणा मध्यें त्याच्या राष्ट्राचे अनुवंशिक गूण दिसत असतात व राष्ट्रीय कल्पना व समजूती यांच्या योगानें निरनिराळ्या व्यक्तींचें विचार बनलेले असतात. समाजशास्त्रा संबधांनें मि. मूरहेड लिहितात कीं मूल उपजलें कीं समाजांतील पूर्व स्थितीच्या संस्कारा मुळेंच त्याच्या अंगीं पुष्कळ गोष्टी आपोआप येतात. राष्ट्रीय प्रांतिक, व अनुवंशिक संस्कारांच्या प्रभावानें मनुष्य बनत असतो आणि या संस्कारांवर मनुष्याचें कांहींच चालत नसून ते आपापले परिणाम व्यक्तिमात्रावर निरनिराळे घडवित असतात. हीच खूण लक्ष्यांत धरून स्पेन्सर साहेब समाजांतील व्यक्तीची व्याख्या अशी करितात कीं व्यक्तिमात्र भूतकालीन गोष्टीचा वंशज आहे. समाजांतील सारभूत गोष्टींचा पुतळा म्हणजे व्यक्तिमात्र होय असें मनुष्याचें लक्षण सांगत असतात.

थोर लोकां विषयीं आपली समजूत असते कीं ते त्यांच्या बरोबरीच्या समकालीन लोकां प्रमाणें नसून ईश्वरदत्त कांहीं विलक्षण बुद्धिवैभवाचे असतात आणि त्यांच्या मध्यें समाजांतील परिस्थितीचे कांहींच गुणदोष नसतात. मोठ्या लोकांची रचना अगदीं निराळीच आहे व समाजांशी त्यांचा कांहीं संबंध नाहीं असें म्हणतात तें खोटें व अयथार्थ आहे. सामान्य लोकांच्या मनामध्यें ज्या कल्पना व विचार गुप्तपणाने किंवा दुर्बोधपणानें असतात त्याच कल्पना व विचार मोठे लोक आपल्या बुद्धीच्या प्रभावानें सामान्य लोकांच्या अगोदर ओळखून काढतात व त्यांस उजेडांत आणितात. आणि याच दृष्टीनें त्या कल्पनांचें व विचारांचें पितृत्व मोठ्या लोकांकडे जातें. ज्या गोष्टी गुप्त व दुर्बोध आहेत त्या प्रगट व सुबोध करून दाखविण्यांतच मोठ्या लोकांचा मोटेपणा असतो. आणि हीच गोष्ट प्रत्येक कालाच्या सुधारकांसही सारखीच लागू पडते. नवीन असें कांहीं नाहीं. ज्ञान ह्मणजे पूर्व-स्थित गोष्टींची स्मृती होय. आपल्हीच ओळख आपणास नव्हती व ती मोठ्या लोकांच्या बुद्धिचातुर्यामुळें होत असते. समाजतांत व्यक्तिमात्रांची स्थिती भूत गोष्टींनीं नियमित व संस्थापित आहे ह्मणून व्यक्तिमात्राला स्वतंत्रपणा किंवा विशिष्ट पृथक्पणा नाहीं असें ह्मणणें चुकीचें आहे. या चुकीच्या समजा प्रमाणें समाज पुढें सरला कीं तदंगभूत व्यक्तिमात्र पुढें सरेल आणि व्यक्तिमात्राच्या श्रमावर कांहींच सुधारणा अवलंबून नाहीं असें होईल. समाज ही सजीव संस्था असून तिची वाढ सजीव प्राण्यांच्या वाढीच्या नियमा प्रमाणेंच आहे असें ज्या तत्ववेत्यांनीं आपल्यास शिकविलें त्यांनींच असें ह्मटलें आहे कीं भूत गोष्टींचें परिणत फळ ह्मणजे व्यक्तिमात्र होय तथापि एवढ्याच लक्षणानें समाजाचा व व्यक्तीचा संबंध सर्वच कळून आला असें घडत नाहीं. व्यक्ति म्हणजे भूत गोष्टींचे वंशज असें स्पेन्सर साहेब ह्मणतात पण तेच पुढें सांगतात कीं व्यक्ति ह्मणजे भविष्यकालीन गोष्टींचा जनक होय. हें शेवटलें लक्षण ध्यानांत विशेष धरलें पाहिजे. समाजाची वाढ किंवा सुधारणा अंतस्थ रितीनें होत आली तशीच पुढें होत गेली पाहिजे, असें सांगून व्यक्तिमात्राच्या हातून कांहींच सुधारणा संभवनीय नाहीं असें कांहीं लोक ह्मणतात. पण ती मोठी चूक आहे आणि समाजाच्या सुधारणेचें शास्त्र त्यांस कळलें नाहीं असें ह्मटलें पाहिजे. समाजशास्त्राचा खरा नियम असा कीं व्यक्तिमात्राला प्रथमतः त्याच्या समाजांतलि लोकांच्या चाली व संवयी लागतात तथापि हें ही खरें कीं व्यक्तिमात्राच्या वर्तनामुळें व स्वभावामुळें त्याच्या समाजांतील लोकांच्या चाली व संवयीं बदलत व बनत गेल्या आहेत. व्यक्तिमात्राचा समाजगत तल्लीनपणा व त्याचा विशिष्ट स्वतंत्रपणा हे दोन गूण विरोधी दिसतात व ते एकत्र असतील असें वरवर पाहणाऱ्यास संभवनीय ही वाटत नाहीं. पण म्याकेन्झी नांवाच्या प्रसिद्ध ग्रंथकर्त्यानें हा विरोध व असंभव मोठ्या वादकौशल्यानें दूर केला आहे. व्यक्तिमात्राचें अस्तित्व समाजावरून ठरतें याचा अर्थ इतकाच कीं ज्या सामाजिक वातावरणामध्यें मनुष्य राहतो त्याचें सामान्य स्वरूप त्या मनुष्याच्या आयुष्यक्रमांत दिसून येतें; आणि मनुष्य स्वतंत्र आहे याचा अर्थ असा कीं जें समाजाचें सामान्य स्वरूप त्याच्या अंगीं उपजत असतें तें एका प्रकाराची प्रेरणाशक्ती आहे आणि तिज पासून निदान कांहीं अंशानें तरी भिन्न भिन्न परिणाम उत्पन्न होत असतात.

मनुष्य स्वतंत्र आहे ह्मणजे सामाजिक परिस्थितीच्या तो स्वाधीन न होतां त्या परिस्थितीवर आपला अंमल चालवूं शकतो व त्या परिस्थितीचा सुधारक बनतो. समाजाची सुधारणा आपोआप समाजांत घडली पाहिजे असें ह्मणतात त्याचा अर्थ असा कीं व्यक्तिमात्रांच्या परिणतीनें समाज सुधारतो ह्मणजे प्रत्येक व्यक्तीला आपल्या अंगभूत विशिष्ट गुणानें समाजाची सुधारणा करिता येते आणि ह्मणूनच व्यक्तिपात्र शक्तिमान सुधारक आहे. अलिकडे कांहीं लोक प्रतिपादन करितात कीं सामाजिक सुधारणेच्या बाबदींत व्यक्तिमात्रानें परंपरा चाललेल्या चालिचा प्रतिरोध करण्यांत कांहीं अर्थ नाहीं आणि समाजाचीच सुधारणा अगोदर झाली पाहिजे. हें प्रतिपादन भ्रामक असून समाजशास्त्राच्या नियमाला बाधक आहे. खरा नियम असा आहे कीं व्यक्तिमात्राच्या सुधारणे पासूनच समाज सुधारतो. व्यक्तिमात्रानें आपल्या समजूती कोपऱ्यांत ठेवाव्या आणि प्रचारांतील चाली, समजूती व रूढी यांचें बाह्यतः अवलंबून करून आपलेपणा सोडून द्यावा असें जे कित्येक लोक सांगतात त्यांची मोठी चूक होते आणि त्यांच्या लक्ष्यांत असें येत नाहीं कीं व्यक्तिमात्रानेंच सुधारणा केली पाहिजे व त्या सुधारणेनें समाजाला चलनवलन मिळालें पाहिजे आणि असें होई पर्यंत समाजाची प्रगती होऊंच शकत नाहीं. व्यक्तिमात्राला सुधारणेची व चलनवलनाची अवश्यकता वाटली व चालू चालीरिती बदलल्या पाहिजेत अशी खात्री झाली ह्मणजे व्यक्तिमात्रानें तदनुरूप कृती करून दाखविली पाहिजे आणि अशा कृती वाचून खरी सुधारणा व्हावयाचीच नाहीं जो मनुष्य रुढीच्या मार्गाला चिकटण्यासाठीं आपला स्वतंत्रपणा सोडतो आणि समाजावर आपल्या व्यक्तिस्वातंत्र्याचें प्रतिबिम्ब उमटवीत नाहीं तो आपल्या नैसर्गिक विशिष्ट गुणसमुदायाचा फायदा समाजाला देत नाहीं ह्मणून तो समाजाचा अपराधी आहे. सामाजिक सुधारणा करण्याला अनुकूल काला अद्याप आला नाहीं अशी सबब सांगतात ती चुकींची होय. हा योग्यकाल तरी कोण ठरविणार हें कळत नाहीं. कालमहिमा असा आहे कीं वस्तुमात्र रूपांतर पावतें पण त्या मुळें सुधारणाच होते असें कांहीं नाहीं. बेकननें असें ह्मटलें आहे कीं जर कालगतीनें गोष्टींचा ओघ अनिष्ट दिशेनें जाऊं लागला आणि शहाण्या लोकांनीं तो ओघ बदलून निराळी दिशा लाविली नाहीं तर काय वाईट परिणाम होईल हें कळत नाहीं. मनुष्यानें कालगतीवर आपला अंमल चालविला पाहिजे. व्यक्तिमात्राला सुधारणेची अवश्यकता दिसून आली आणि तो तसाच स्वस्थ हात जोडून बसला, आपली जिभ आवरून मुका झाला व त्यानें रूढी या वेदीवर आपल्या मनोदया विरुद्ध आपलें आयुष्यांतील सर्वस्वचा बळी दिला तर कोणत्याच समाजांत सुधारणेची आशा नाहीं. शहाण्यानें सुधारणेचे अग्रणी बनलें पाहिजे आणि असें होईल तरच समाज सुधारेल. व्यक्तिमात्राचें स्वातंत्र्य हेंच व्यक्तिविषयक व समाजविषयक सुधारणेचें मूळ बीज आहे आणि व्यक्तिस्वातंत्र्याची पूर्णावस्था समाजाची सुधारणा करूं शकेल.

सामाजिक सुधारणेंचे आदी बीज जी व्यक्तिमात्राची स्वतंत्रता तिची ओळख करून घेताना कोणत्या खुणा दृष्टीस पडतील हें सांगताना राजश्री चंदावरकर ह्मणाले कीं प्रथम दर्शनीं व्यक्तिमात्रानें आपल्या मनाशी पक्का विचार केला पाहिजे आणि असा विचार करावयाचा तो हा कीं परंपरा चालत आलेल्या गोष्टींचा व रूढींचा उद्देश समजून नंतर त्यांचा स्वीकार किंवा धिक्कार प्रत्येकानें करावा आणि निव्वळ अंधन्यायानें जुन्या चाली व रुढी पाळूं नयेत. विचार पूर्वक अशी वागणूक ठेविली, तर आपण आपल्या पूर्वजांच्या कृतीला अनुसरून वागतों असें होईल. आपल्या पूर्वजांनीं स्वकीय स्थितीला अनुकूल अशा सुधारणा केल्या तशाच आपण आरंभिल्या असें होतें. अमूक सुधारणा पाहिजे इतकें बोलून कांहीं काम होत नाहीं तर बोलण्याप्रमाणें कृती करून दाखविली पाहिजे. तोंडी उपदेश पोकळ व व्यर्थ आहे प्रत्यक्ष कृति शिवाय उपदेशाला कांहीं किंमत नाहीं. कृतीला आरंभीं यश आलें नाहीं तरी त्या कृतीनें यशाचा पाया घातला असें समजावें.

The Berar Samachar

MONDAY SEPTEMBER 21 1896

Mrs. J. L. Philipbs, secretary for India of 'The world's women's Temperance Union' who is now travelling and lecturing in India delivered a lecture here on Monday last at the Native General Library before a public meeting of the citizens of Akola. Mr. S. V. Patvardhan, Director of Public Instruction H. A. D. was in the chair. Mrs Philiphs is accompained by two other ladies who are her colleagues in her laudable undertaking.

She first expressed her satisfaction for having obtained an opportunity to address the people of Akola and then dwelt upon the necessity of invoking nece the assistance in their diffcult undertaking. Then a sacred hymn from the Bible was sung in company to the solemn organ. Upon this a priest who also has accompained her, prayed that their movement may take hold upon the hearts of men and women. Mrs Philipbs then rose to speak. She said "I came to India with my young husband many years ago. It was his delight to love India and the Indian people. By his charitable disposition and sound advice he had attracted the hearts of many to himself. He had seen several people who cried to him "oh! help us in this terrible misery, poverty and wretchedness. King alchohol has ruined us." In England and America old alchohol is a terrible enemy and is ruining thousands every day. Some twenty five years ago India could call herself a temperate country but now she cannot. Take for instance the central provinces: there is not an inch of ground in these provinces which is not supplied with this terrible foe. We have been finding in America and England how we can save ourselves from this enemy and now we come to India to tell you what can be done in this country too."

Now her friend, Mrs. Denny, performed some experiments to prove the extremely injurious character of alchohol. She took a bottle of alchohol in her hand and asked the boys to tell what it was. Many of the boys that had assembled there told her that they thought that it was water. But she told them that it was not water but a very terrible stuff disguised as water and possessed of qualities quite different from water. Then she poured out some alchohol in a basin and proceeded to show to the audience that it was more like fire than water and she did this by touching the liquid with a burning match, which at once took fire. Then she said that the bodies of those who take in this liquid daily in large quantities may be set on fire similarly by touching them with a match. Then she performed another experiment. She took an egg, broke it, took out the albumen therein and cooked it by pouring a few drops of alchohol upon it. And she told that there is a similar substance in our brain which will be cooked if we take in this liquid which is carried to the brain from the heart.

Then she told the story of a young Bengali Brahman who is nearly 16 years old. She said that it is not only the lower class of people that are in the habit of drinking but many men of the upper class also are doing the same. This young Brahman, she said, is cooking his brain. He went twice for his examination and twice he failed. His mother, a nice lady who is thickly acquainted with her, talked much to her about it and asked her a remedy to make her boy pass his examination. She is yet young and beautful, has love of her husband, has a wardrobe be of nice clothes to wear, has god ornaments and every thing that makes life lovable but she abandons every thing and is always gloomy. What is the good of this money? She says, when the only hope of my life is thus at ruin? Charles Dickens also tells, she said of a man in England who was so full of alchohol that his body could be set on fire. Thus men are ruined first in body and brain, then in character and ultimately in their soul.

Then she told another story of the ruin of some boys in America. There is a beauty lake, she said, by name Some boys were sailing in it in a boat. A man on the bank shouted "Beware of the sharps" But they did not listen to it. They disregarded a similar warning given to them by another man. In a moment they got into the rapids and destroyed. Then she exhorted the lads and young boys to remember the story and resumed her seat.

Mrs Philiphs again got up and continued her lecture. She told the audience how interested the Americans were in this movement. Then she told how two hundred villages in America were cleared of this dreadful enemy of mankind simply by the exertion of women which is called, she said, women's crusade. King alchohol she told has established his sovereignty in England America and Australia and now this enemy has got in India she told the people to check the progress of this enemy in various ways. She asked the citizens to send in memorials to the government which she said was a kind one and would listen to their call. They would also be helped by all the mission aries in this country. Then she told the municipality to make use of the local option and not to allow to remain this dangerous stuff within its local limits Then she asked the secretary of the Temperance assosiation Akola to have lectures on the subject. She said that Indians should have a bone, like the Europeans, to fight with the government on this subject and to banish this stuff out of their cou ry. Having said so much she concluded her lecture.

The president at the end told the lecturer and the other missionaries that in India women at least has not y e begun to drink, that there is already a prohibition of shastras to the effect and women being naturally very conservative are not likely to violate that injunction of shastras; that in India these problems were solved a thousand years ago which are now coming on the horizons of the Europeans; that although it was true that along with the advent of the British rule this vice also has got a footing in the land still as those who are in habit of drinking are held in extreme abhorrence by the public there is hope that in time the vice will be uprooted at last. With above of thanks to the president the meeting terminated. The President further pointed out at the close that the religious neutrality of the British has *practically* abolished the ecclesiastical tribunals of India and has been the *passive* cause of the vice of drinking.

In his review of the Registration report for the last three years th resident has well summarized the noteworthy points of public interest in the following para:—

"With regard to documents the registration of which is by law compulsory the period under review shows a very largely increased business in comparison with the cycle immediately preceding. The average number of annual registration of this class for the years 1890—91 to 1892—93 was only 22,576, while in the last three years it has risen to 27,174. At the same time it must be noticed that if the three years from 1893-94 onward are considered individually, the number of compulsory registrations shows a distinct tendency to decrease, the falling off being particulorly marked in the case of mortgage deeds for amounts of Rs. 100 and upwards. Of such mortgage deeds 11,485 were registered in 1893—94, 11,084 in 1894—95, and 10,145 only in 1895—96. No reason has been assigned by the local officers for this remarkable decrease in the number of mortgage deeds registered; but taking into consideration the simultaneous increase in the number of sale deeds registered, it may possibly be due in part to an impression that exists among the agricultural population that a sale is not final, however formal it may be in its terms, and in spite of the fact that the instrument is registered, so long as the transfer is not recorded in the revenue papers. The number of optional registrations remains much as it was during the previous three years, and indeed it has hardly varied during the last 26 years. Other features of interest in the working of the Department during the period under review are the large increase in the value of property affected by documents presented for registration and the sudden increase in the number of copies of certificates of sales under the Civil Procedure Code which were filed in the Buldana district during the year 1895—96. As to this latter matter the Commissioner, Hyderabad Assigned Districts, has directed an enquiry to be instituted, and the Resident will be glad to be informed of its result in due course."

वऱ्हाड

हवामान—पाऊस नाहीं ह्मणून प्रांतभर लोक हवालदील झाले आहेत. इवेंत उष्मा विशेष असतो ह्मणून पाऊस थोडाबहुत पडेल असा सुमार आहे. रोगराई विशेष ह्मणण्यासारखी नाहीं.

शेगांवचे भाटे मि. खटाव फरसू यांच्या वरील फौजदारी खटल्यांत क्याप्टन आयऱ्ह र्स साहेबांनीं केलेला हुकूम रद्द करण्यासाठीं जिल्हा माजिस्ट्रेट यांनीं तें प्रकरण हायकोर्टाकडे पाठविलें आहे.

आजपासून उमरावतीस हायर व लोअर परीक्षा सुरूं होतील.

अलिशान रेसिडेंट मि. प्लौडन यांची स्वारी वऱ्हाडांत येणार असून साहेब बहादूरांचा चिखलदऱ्यास २।३ आठवडे मुक्काम होणार आहे अशी प्रमोदसिंधु कर्त्यांस वर्दी लागली आहे.

रा० रा० गोविंद गंगाधर दामले तहशिदार मलकापूर यांची बदली वणीस करून वणीचे तहशीलदार मि. रहिमतुल्ला यांस मलकापूरास बदललें असें ह्मणतात.

मि. माणिकशा रतनजी एक्स्ट्रा असि. कमिशनर, बुलढाणा यांची बदली शिकंदराबादेस होणार असून त्यांच्या जागीं रा० रा० पंडित सुरज नारायण स्पेशल असि. कमिशनर हे, शिकंदराबादेहून बुलढाण्यास येतील.

रा० रा काशिनाथ श्रीराम जठार अव्याची, बुलढाणा हे दोन महिन्यांच्या रजेवर पुण्यास गेले आहेत. ते रजेवरून परत आल्यावर दुसऱ्या कोणत्या तरी ठिकाणीं बदलले जातील असा संभव आहे.

इलिचपरास 'प्रभात' नांवाचें सप्ताहिक वर्तमानपत्र गेल्या १५ दिवसापासून निघूं लागलें. त्याचे पहिले २ अंक आह्माकडे आले अहेत. हा प्रेमाचा प्रभात असाच अव्याहत होत जावो.

पुसद. ता. १७।९।९६

पाऊस नाहीं. दिवसभर प्रखर उष्णता असते व रात्रीं स्वच्छ चांदणें पडतें. पिकें आतां पर्यंत कशी तरी टिकून आहेत परंतु लवकर पाऊस पडला नाहीं तर तीं बिघडून जातील. दरसाल पेक्षां यंदा तिळाचा पेर सुमारें तिपटीनें जास्त आहे. अलीकडे येथून जवारी अकोल्यास फार रवाना होत असल्यामुळें जवारीचा भाव बराच वाढला आहे.

येथील नवीन बाला साहेबांचें देवालय बांधण्या करितां वर्गणी जमविण्याचें काम सुरू आहे मागील व नवीन वर्गणी मिळून आतां पर्यंत एकंदर रु० ३८२७ झाले. या शिवाय भोजले येथील नारायणगीर गोसावी यानें आपली स्थावर व जंगम जिनगी [विहिर आंबराई वगैरे] देवस्थानास बक्षिस दिली व मल्लापा राभजी मेथेकर यानें एक ४०० रुपयांचें गाहणखत बक्षिस दिलें. याप्रमाणें देणग्या मिळत गेल्यास संस्थानचें काम चांगलें चालेल.

आज रोजीं संस्थान कमिटी जमली होती तेव्हां मे० डेपुटी कमिशनर साहेबांचे परवानगीनें मे. विठूजी नारायण तहसीलदार यांस या संस्थेचे कायमचे अध्यक्ष नेमण्यांत आलें.

नोटीस.

नोटीस बेशर्मी नरसाजी वल्लद नारायणजी सरोदे जात कुणबी राहाणार मौजे पिपळोद प्रगणें दह्यांडे तालुके दर्यापूर यांस

खाली सही करणार इजकडून नोटीस देण्यांत येते कीं मी तुह्मास तारीख ३ माहे सप्टेंबर सन १८९५ इसवी रोजीं स्थावर जंगम सबंधी दिवाणींत फिर्याद करण्याकरितां ह्मणून कुल मुखत्यारपत्र करून दिलें होतें परंतु आज पावेतो तुह्मी माझेवतीनें कांहींच काम केले नाहीं. व तुह्मी माझेशी चांगले रितीनें वर्तन ही करीत नाहीं सबब तुह्मास करून दिलेले मुखत्यारपत्र रद्द केले आहे तुह्मी माझे नांवानीं कर्ज वगैरे काढल्यास त्याची जबाबदार मी होणार नाहीं, कळावे, तारीख १७ माहे ९ सन १८९६ इसवी

सही.
निशाणी तानाबाई मर्द भगवानजी
खाडे राहाणार पिंपळोद इचे
हातची बांगडी असें

वर्तमानसार.

शेतकी कशी करावी या बाबतींत पुण्याच्या इंजनेर कालेजाचे मुख्य प्रोफेसर कुक हे एक पुस्तक तयार करीत आहेत

अ. द.

मोठ्या दातांचा सर्प.— मद्रासच्या सरकारी संग्रहालयांत एक नाग आहे. त्याची लांबी १२ फूट असून त्याचे दांत ३ इंच लांबीचे आहेत. हा नाग लहान लहान सर्पास व प्राण्यास तेव्हांच चावून टाकितो.

पेरू देशाहून तार आली आहे कीं तेथें अंडीज पर्वतांमध्यें सुमारें दहा मैल लांबीची एक टेकडी उंची सोन्याची बनलेली सांपडली आहे. हे सगळें युरोपियन लोकांचें भाग्य!

चंबा येथें सारखा वीस तासपर्यंत मुसळधार पाऊस होता. न्या० सिं०

या पृथ्वीवर एकंदर लोक संख्या १,३०,००,००० आहे; या इतक्या लोकांवर राज्य चालविण्या करितां १२ बादशहा २६ राजे, ४७ राजपुत्र, १७ सुलतान, १२ खान, ६ ग्रांडड्यूक, ६ ड्यूक, १ व्हाईसकिंग. १ निजाम, १ राजा; १ इनाम, १ वे आणि २८ अध्यक्ष आहेत. या शिवाय संस्थानिक वगैरे पुष्कळ आहेत.

इंग्लिशांच्या एकंदर जाहाजांच्या उभारणी करितां १,८७,१०,००,००० रुपये भांडवल गुंतलें आहे. क० त०

बाबू सीतानाथदास कलकत्ता हाय कोर्टाचे अटर्नी ह्यांनीं बाबू कालीदास मुकरजी ह्यांच्या तर्फे ईस्ट इंडिया रेलवे कंपनीवर १६ हजार रुपये नुकसान मिळण्याबद्दल तेथील हाय कोर्टांत फिर्याद केली आहे. बाबू कालिदास मुकरजी यांचा तरुणपुत्र अतींद्रनाथ मुकरजी हा ता० ६ मे रोजीं इंडिया रेलवेतून जात असतां त्या गाडींतील एका डब्यांत दारूचे गोळे ठेविले होते. ते एकाएकी पेटून मोठ अवाज झाले व त्यामुळें इतर डब्ये पेटून बाबू अतींद्रनाथ व आणखी पुष्कळ लोक मेले.

पुरुषाचे पोटांत पांच महिन्याचा गर्भ सांपडला— एका तरुण पुरुषाचे पोटांत गुल्म [ट्युमर] आहे असें समजून तो काढण्यासाठीं शस्त्रक्रिया करण्यांत आली. पोट चिरल्यावर आंत गुल्म नसून एका पिशवींत पांच महिन्यांचा जसा गर्भ असावा तसा स्त्री जातीचा गर्भ आढळला. शस्त्रक्रिया झाल्यावर तो मनुष्य फार वेळ जगला नाहीं. प्यारिस येथील अकॅडमी डी मेडिसिन [वैद्यकीची सभा] पुढें ता० ९ मे रोजीं ही हकीकत वाचण्यांत आली. सृष्टिवैचित्र्यांपैकीं ही एक फारच विलक्षण गोष्ट होय.

बकासुर— बडोद्यास एक ब्राह्मण सरकारचे पदरीं दरमहा देऊन ठेविला आहे. हा जेवणांत १०० लाडू एका वेळेला फस्त करितो! लाडूही लहान नव्हते. कवठा एवढाले!

काबूलचे अमीर अबदुल रहिमान ह्यांनीं आपल्या नांवाचें सोन्याचें नाणें पाडिलें आहे.

मुंबईस एक नवें "मराठा कालेज" स्थापित होण्याचा विचार बहुतेक ठरल्यासारखा झाला आहे. पाहिजेच होतें! न्या. सु.

गुरुवारीं सकाळीं मद्रास येथें आंत एक मुसलमान स्त्री असलेली डोली समजून एक डोली मद्रास सिटि दिवाणी कोर्टामध्यें आणिली होती. आणि कोर्टाच्या अधिकाऱ्यांजवळ ती बनारस बाई आतून स्त्री सारखी हळू उत्तरेंहि देत होती, पण संशय आल्यावरून मग ती डोली उघडली तेव्हां ती मध्यें एक लांब दाढीवाला बोवाच सांपडला, दी० बं०

तेल आणि पाणी.—तेल आणि पाणी एकत्र झाल्यास त्यांत, तेलानें भिजलेली एक सुताची लांब वात बुडवून तिचें दुसरें टोंक जवळ ठेवलेल्या रिकाम्या भांड्यांत सोडावें. म्हणजे त्या वातीतील केशाकर्षणानें पाण्यांत मिसळलेलें तेल शोषलें जाऊन तें तेल त्या दुसऱ्या रिकाम्या भांड्यांत थेंबथेंब पडतें; आणि ह्याप्रमाणें तें तेल पाण्यापासून वेगळें होतें.

फाजील लज्जेनें हानी!—बिहार प्रांतातील भिसा नामक गांवीं थोडे दिवसापूर्वीं एका घराला आग लागली. त्या घरांत बारा पडदानशिन स्त्रिया होत्या, व त्यांतच नुकतेंच लग्न झालेली तरुणी होती. घराला आग लागल्यावर, आपण घरांतून बाहेर निघालों तर बाहेर आग विझविण्यास जमलेले लोकांच्या दृष्टीस आपण पडूं ह्या भितीनें ती नववधू घरांतून बाहेर निघेना, व तिचेंच अनुकरण इतर पडद्यांतल्या स्त्रियांनींही केलें. परंतु अग्नीला गोषांतल्या स्त्रियांकडे पाहूं नको असा हुकूम करणारे कोणी नसल्यामुळें ती आग त्या बाया ज्या ठिकाणी आपला गोषा संभाळून बसल्या होत्या, त्या ठिकाणासही लागून त्यांतील ८ जणी तेथल्या तेथेंच जळून गेल्या व चौघींना मरणोन्मुख स्थितींत होरपळलेल्या अशा बाहेर काढल्या! कोण ही फाजील लज्जा! हीं असलीं गोष्यांचीं व जनान्यांचीं वेडें नाहींशीं होऊन फाजील लज्जेचा इकडील बायका कधीं त्याग करितील! श्री. स. वि.

तंजावराजवळील एका हिंदू बालविधवेनें तारुण्यमद अनिवार झाल्यामुळें त्रिचनापल्लीस पळ काढून एका बाब्याबरोबर पुनर्विवाह लाविला त्याप्रमाणें दुसऱ्या दोघां हिंदुविधवांनीं तिकडे मुसलमानाबरोबर निक्के लाविले, अशी खेदकारक हकीकत मद्रासच्या हिंदू पत्रांत आली आहे.

चीन देशांतल्या सर्व रेशमाचे कारखान्यांत ४० पासून ६० लाख पर्यंत माणसें कामें करीत असतात.

चीन देशांत भर रस्त्यावर अथवा बाजारांत कोणी मनुष्य कोणावर संतापून मोठ्यानें बोलला तर त्याजवर तावडतोब खटला करून त्यास ९ दिवस पर्यंतची कैदेची अथवा दंडाची शिक्षा देण्यांत येते.

अवघ्या दुनियेंत हल्लीं चालू असलेल्या सोन्याच्या नाण्यांची किंमत ७० कोट पौंड असून त्या सोन्याचें वजन एकंदर एक हजार टन म्हणजे २८००० मण आहे असा अनमान एका अंकगणित्यानें काढला आहे,

आस्ट्रियाच्या महाराणीनें प्रसंगवशात् आपले सर्व दागिने अंगावर घातले म्हणजे तिला जवाहिरखान्यावरचे अधिकाऱ्यास आपण इतके व अमुक दागिने घेतले अशी स्वदस्तुरची पावती द्यावी लागते! शु० सू०

दक्षिणमहाराष्ट्रांतील शेतकी केवळ आकाशांतून पडणाऱ्या पावसावर अवलंबून असल्यामुळें दुष्काळ पडून जे हाल होतात ते टाळण्याकरता सरकारानें ह्या सर्व भागांत विहिरी करण्याची व्यवस्था करावी म्हणजे सरकारास जमाबंदीचा फायदा होऊन रयतेस आकाशांतल्या पावसावर अवलंबून राहण्याचें भाग न पडतां विहिरीच्या पाण्यावर आपली शेतकी करून आपला निर्वाह करण्यास साधन होईल; विहिर केली कीं, सरकार पाटस्थळाचा धारा घेतें या भीतीनें लोक आपण होऊन विहिरी करीत नाहींत. करिता सरकारानेंच विहिरि करून द्याव्या आणि पहिल्या वर्षी ०४, मग ०८, मग ०१२ व चवथ्या वर्षी १ रुपया अशा रीतीनें धारा घेण्याचें सुरू करावें आणि मग पाटस्थळाचा धारा घ्यावा म्हणजे लोकास जड न जातां त्यांची सोय होईल; दुष्काळ फंड विहिरि करण्याकडे लावावा आणि त्या भागांत फार तर ३० हातांवर पाणी लागत असून ते बहुत्येक ठिकाणी चांगलें विपुल लागत असल्यामुळें कालव्याचे पाटस्थळ करण्यापेक्षां विहिरीचें पाटस्थळ करणें चांगलें; असें मेजर जनरल निकसन यांचें म्हणणें आहे. त्या भागांतल्या माझ्या प्रवासांत चाऱ्याच्या कमताईनें थकून गेलेलीं जनावरें पाहून हे विचार माझ्या मनांत आले व मी त्याचा मागें अनुभवही घेतला आहे असें त्यांचें सांगणें आहे.

झांशीस जी लटकी लढाई व्हावयाची होती ती तेथें कालरा सुरू असल्यामुळें रहित झाली.

चित्रळरस्त्यावर दांडगा पाऊस पडल्यानें रस्त्याची फार खराबी झाली.

यार्कंड येथील दंगा वाढत नसून तेथें आतां शांतता झाली आहे.

हिंदुस्थानची फौज उत्तम प्रकारची तरबेज असून जगांत कोणत्याही ठिकाणीं कोणत्याही फौजेबरोबर राष्ट्राच्या हिताकरतां सामना करण्यास लायक व सज्ज आहे असें लार्ड राबर्टचें म्हणणें आहे.

कटक येथें लष्करी शिपायांची मारामारी होऊन बरेच लोक जखमी झाले.

दंगेखोर अर्मेनियन लोकांनी मागें सांगितलेली सुलतानाची ब्यांक जी ताब्यांत घेतली ती ताब्यांत घेण्याची रीत फार मासलेदार आहे. शिकलेले व चांगल्या पोषाखाचे असे २९ अर्मेनियनलोक दोघे दोघे तिघे तिघे असे प्रथम वेगळाल्या निमित्तानें त्या ब्यांकेंत शिरले आणि रुपयांच्या थैल्या म्हणून खांद्यावर घेऊन त्यांच्या बरोबरचे हमालही आंत शिरले. या थैल्या वास्तविक रुपयांच्या नसून अपघात करणाऱ्या काडतुसांच्या होत्या. आत गेल्यावर एकदम त्या काडतुसांचा धडका झाला व ब्यांकेंतल्या १०० कारकुनास कैद करून ब्यांक ताब्यांत घेतली. बंदुक व बाण यांचा मारा चालू करून १२ तासपर्यंत त्यांनीं ती ब्यांक आपल्या ताब्यांत ठेवली आणि मग कांहीं शर्तीवर स्वाधीन झाले.

कान्स्टांटीनोपल येथें अर्मेनियनांची जी कत्तल झाली ती पोलीस व इतर अधिकाऱ्यांच्या सम्मतीनें झाली असें बड्या राजांच्या वकिलांचें म्हणणें आहे पण त्याचा दोष दंगेखोर अर्मेनियन लोकांवरच आहे असें सुलतानाचें म्हणणें आहे.

रशियन बादशहा बर्लीन येथें आला आणि त्यांची व जर्मनबादशहाची भेट व थाटमाट झाला. रशियन झार तेथून निघून गेल्यावर जर्मनबादशहानें सर्वांस सांगितलें कीं, सुधारणा व शांतता या करतां आपली फौज आहे असें रशियनबादशहानें सांगितलें आणि स्वसंरक्षणार्थ युरोपांतल्या लोकांचा एकोपा करण्याचा त्याचा व माझा विचार ठरला आहे. यावरून इंग्लंडास ह्रपेंत ठेवण्यांत येईल असें रशियन पत्रांचें म्हणणें आहे.

डार्डनेल तहांत दुरुस्ती करण्याची वेळ आली आहे असें कित्येक युरोपियन लोकांचें म्हणणें असल्यावरून जर्मनपत्रें म्हणतात तसें करणें हें जर्मन राज्यपद्धतींत बदल करणें आहे.

कान्स्टांटीनोपल शहर अगदीं गडबडून गेलेलें आहे. टर्कीच्या सुलतानास पदच्युत करावा असें इंग्रजांचें म्हणणें आहे [!] इंग्लंड व इटाली यांच्या हरकतीस न जुमानतां टर्की सरकार अर्मेनियन लोकांचीं गलबतें भरून कान्स्टांटीनोपल येथून रवाना करीत आहे व त्यांनीं परत न यावें म्हणून त्यांच्यावर नजर ठेवण्यांत येत आहे.

मुंबई व गोवें त्यांच्या दरम्यान रोज एक आगबोट सुरू झाली आहे. अ० द०

झांझीबार—झांझीबार येथील जर्मन वकिलातींत आश्रयासाठीं राहिलेल्या सय्यद कलिद यांस इंग्लिश सरकारचे ताब्यांत देण्याचें जर्मनीनें नाकारिलें कारण तो राजकीय अपराधी आहे, असें जर्मन सरकारचें म्हणणें आहे.

सती— फरुकाबाद येथील रहाणारे व बनारस कोर्टीतील इनस्पेक्टर बाबू मुरलीधर या नावांचे एक गृहस्थ कित्येक दिवसांपासून आजारी होते व गेल्या तारीख २७ जुलई रोजीं ते मरण पावले. हे आजारी असतांना यांची सुशील पत्नी त्यांच्या बिछान्या जवळच त्यांच्या सुश्रूषेंत सारखी हजर होती. शेवटच्या दिवशीं पतीचें देहावसान होण्यास प्रसंग आलासें पाहून ती घरांतील अगदीं वरल्या माडीवर गेली आणि स्नान करून तिनें श्वेतवस्त्र परिधान केलें. इष्ट देवतेचें पूजन केलें व आपल्या सर्वांगास तूप लावून वस्त्र पेटवून दिलें. इकडे मंडळी तिच्या पतीच्या व्यवस्थेस लागली होती. ती बाई अद्याप बाहेर कां येत नाहीं म्हणून मंडळी तपास करूं लागली, तों तिसऱ्या मजल्याच्या खोलींत धूर निघत असलेला त्यांचा पहाण्यांत आला. आंत जाऊन पहातात तों ती बाई गतप्राण होऊन पडलेली दिसली ही हकीकत हां हां म्हणतां सर्व गांवभर पसरली व हजारो लोक या सतीच्या दर्शनास धावूं लागले. जमलेल्या मंडळींनीं त्या पतीपत्नीस मोठ्या थाटानें गंगा तटाकीं नेऊन विधिपूर्वक अग्नी दिला. अशा स्त्रिया हल्लींच्या काळांत क्वचित् दृष्टीस पडतात.

इं० प्र०

☞ हें पत्र आकोला येथें कै० वा० खंडराव बाळाजी फडके यांचे "वऱ्हाडसमाचार" छापखान्यांत नारायण खंडेराव फडके यांनीं छापून प्रसिद्ध केलें.

[illegible] ,, २ ,, [illegible]
साल अखेर ,, ७ ,, १ ८

किरकोळ अंकास................. ८४

नोटिशी बद्दल
१० ओळीचे आंत रु० १
दर ओळीस ८१ ८६
दुसरे खेपेस ८

Annual in arrears 7 ,, 1 Rs. 8 ae 5
Six monthly......... 3 ....,, 8 as
Single copy .... 4 as

Advertisement.
Below 10 lines ... 2 Rs
Per line over 10 ... 4 as.
Repetition Per ine ...3 as

वऱ्हाडसमाचार.

THE BERAR SAMACHAR

VOLXXX AKOLA MONDAY 28 SEPTEMBER 1896 NO 38

वर्ष ३० आकोला सोमवार तारीख २८ माहे सप्टेंबर सन १८९६ इ० अंक ३८

मुंबई बँकची ठेव ठेवण्याची बँक.

या सेव्हिंग बँक मध्यें खालील अटीवर ठेव ठेविली जाईल.

कोणत्याही एका वर्षांत ह्मणजे जानेवारीच्या १ ले तारखे पासून तो दिसेंबरच्या ३१ तारखे पर्यंत फक्त एक हजारा पर्यंत रुपये ठेविले जातील.

दोन अथवा अधिक मनुष्यांच्या नांवानें देखील एक ठेव ठेविता येईल. व त्यांच्या हयातांत, तसेंच त्यांचे पैकीं कोणी वारले तर त्यांचे मागें त्यांच्या पैकीं एकास अथवा अधिक जणांस ठेव काढतां येईल.

एका वर्षांत एक हजार रुपया पर्यंत ठेवलेल्या रकमेवर दरसाल दर शेंकडा २ दोन रुपये व्याज दिलें जाईल. मात्र ५००० पांच हजारा वरील रकमेस व्याज नाहीं.

मुंबई ब्यांक
आकोला १०।७।९६. } R. Aitken
Agent

नोटीस

चरनजीव राजश्री गोविंदराव त्रिंबकराव देशपांडे राहाणार तांदळी खुर्द यांस खालीं सही करणार याजकडून नोटीस देण्याचे असे कीं लक्ष्मी बाई ही आपले तीर्थरुपाची आई असून ही हल्लीं मरन पावली आहे. मी तिचा वडील-वारस असून तुह्मी धाकटे आहा सबब तुह्मीं बाईचे संबंधानें बाईचे आप्त व मुक्त्यार याकडेस जाऊन कोणताही दस्तैवज अगर रशीद देऊन अगर घेऊन कोणताही निकाल करूं नये कारण तुह्मास कोणतेच काम करण्याचा अधिकार नाहीं या शिवाय माझे नांवानी असलेल्या जमीनी संबंधी तुह्मास कांहीं मागणें असल्यास दिवाणी कोर्टे मारफात निकाल करून घ्यावा विनाकारण माझे लागवण केलेले असामीसी व मशी विनाकारण तंटा केल्यास तुमचे हक्काचा संबंध न रहाता फौजदारींत फिर्याद करून निकाल केला जाईल तुमची समजूत होण्या करितां व वृत्ती संबंधी जे जे तुमचे हिस्साचे हक्क घणें असेल ते दिवाणी मार्गानें निकाल करून घेण्या करितां या नोटीशीनें कळविलें जात आहे. कळावें तारीख २२ माहे सप्टेंबर सन १८९६ इ.

सही
नारायण त्रिंबक देशपांडे मुकाम
तांदळी खुर्द द० खु०

नोटीस

ती० रा० श्री० गोपाळराव देशपांडे व सदाशीव मल्हार कुळकर्णी हल्लीं राहाणार अकोलें यांस खालीं सही करणार याजकडून नोटीस देण्यांत येतें कीं लक्ष्मी बाई ही माझ तीर्थरुपाची आई असून तुमची आप्त असल्यामुळें तुमचे जवळ रहात असून ती हल्लीं मरण पावली आहे मी तिचा वडील वारस असल्यामुळें कळवितो कीं सदहू बाई इजला दर सालचे उत्पन्न काय होत व खर्च दरसाल काय होत होता व हल्ली तिची जिंदगी तुमचे ताब्यांत काय काय आहे शिवाय बाई संबंधी देण्या घेण्यांचे दस्तैवज काय काय आहेत त्या सुद्धां तुह्मी आह्मांस सर्व हिशोब देऊन आपची रसीद घेऊन आमचा सर्व निकाल करून द्यावा या कामांत तुह्मी आमच्या शिवाय आमचे बंधुची अगर दुसरे कोणाची कांहीं बाईची जिंदगी वगैरे देऊन रशीद घेऊन निकाल केल्यास आह्मी जबाबदार न होता पुन्हा तुमचेवर दावा होऊन निकाल करून घेतला जाईल असें या नोटीशीनें कळविलें जात आहे. कळावें तारीख २२ माहे सप्टेंबर सन १८९६ इसवी.

सही
नारायणराव त्रिंबक देशपांडे
मुकाम तांदळी खुर्द
दस्तुर खुद्द.

क्रान्तिलाभ

(लिहून आलेला मजकूर)

ज्ञानाचा प्रसार होणें हें कोणत्याही देशाच्या उन्नतीचें आदिकारण आहे. ज्ञानाच्या प्रसाराचा काळ ह्मणजे एका प्रकारच्या क्रांतीचाच काळ होय ज्या वेळेला पाण्याचें बर्फ बनतें किंवा पाण्याची वाफ होते त्या वेळेला पाण्यांत केवढी गडबड होत असते? परमाणूंवर परमाणू कसे आदळत असतात आणि केवढा अवाज होत असतो हें सर्व पदार्थ-विज्ञान-शास्त्रज्ञांस माहित आहेच. परंतु चुलीजवळ बसणारी आजीबाई देखील इतकें सांगूं शकते कीं पाण्यास अधण आल्यावर तें भांड्यांत फार उसळत असतें. ह्याचें कारण जलवायुक्रांतीच्या वेळची त्याची अवस्था होय. परंतु भिन्नप्रकृतिवशात् ह्याच कारणास जो तो आपल्या वकुबा प्रमाणें निराळें रूप देऊं पहातो व अवस्त्वारोप अज्ञानामुळें होतो.

मनुष्यवर्ग बालपणांतून प्रौढावस्थेंत पोहोंचतांना असेच फरक आपणास दृष्टीस पडतात. वनस्पति वर्गास देखील हाच नियम लागूं आहे. चराचर सृष्टीचा हा जो नियम सांगितला तोच जनसमूहासही लागूं आहे. ज्याला ह्मणून थोडी विचारशक्ति असेल त्याला ही गोष्ट सहज उमगण्या सारखी आहे. समाज ह्मटला ह्मणजे तो व्यक्तिघटनेनें बनलेला असतो. व्यक्तिसमुदाय ह्मणजे समाज. समुद्रांतील ऊर्मिलेखेच्या शिखरावरील बिंदु घेतला तरी तो जलमय असून दधिमय नसतो. अम्भ हीच समुद्राची प्रकृति. आवर्त, बुब्दुद, तरंगादि त्याचे विकल्प आणि आभास होत. या वरून समाजरचना व्यक्तिमात्राच्या मगदुरा प्रमाणें पक्क अथवा अपरिपक्क असणार हें उघडच आहे.

समाजाची प्राचीन काळामध्यें जी स्थिति होती तीच स्थिति कायम राहील तर चीन देशा प्रमाणें आपण एक मजलही पुढें न जातां आपली प्रगति होणार नाहीं. पूर्वीच्यांस च उत्तम समजून बाबावाक्यं प्रमाणं या न्यायानें त्यांचेंच आपण स्तोम माजवीत चाललों तर त्यांचे दुर्गुण टाकून देणें दूरच राहिलें परंतु आपली उत्तरोत्तर अपकृष्ट स्थितिच होत जाणार या करितां पूर्वींच्या लोकांनीं तोंड झांकून रंडीबाजी केली असल्यास अथवा येशूच्या कळपांत जाऊन येश्वदातीरीं अघमर्षण केलें असल्यास किंवा एखाद्या नांदत्या गोसाविणीचा अभिलाष केला असल्यास किंवा आपल्या बरोबरीच्या मित्रवर्गाच्या व सस्वेद बंधूच्या भार्येच्या टिकाणीं कामेच्छा ठेवून त्या मित्रास नित्य हुताशनी करण्याची पाळी आणून दिली असल्यास तशा सारख्या अवगुणांचें समाजानें अनुकरण न करणें हें योग्यच आहे. समाज याहून निराळ्या प्रतीचा बनूं लागल्यास खऱ्या देशभक्तांस त्या पासून आनंदच झाला पाहिजे. पाण्याचा प्रवाह पुढें धांव घेत असतो, व पुन्हां मागें येत नाहीं तद्वत् समाजानें नेहमी पुढेंच धांव घेत असलें पाहिजे.

अशा प्रकारें जेव्हां जेव्हां ह्मणून समाज एक एक पाऊल पुढें टाकीत जाईल, त्या त्या वेळीं एका प्रकारची क्रान्ति झाल्यासारखा आभास होईल हें उघड आहे, डेलासची जूट मोडिल्या नंतर भरभराटीच्या शिखरास पोंचलेल्या अथेन्स शहराच्या भिंती पाडाव्या लागल्या आणि त्या वेळेला सर्व जणांनीं जुलमी राज्याची तटबंदी मोडते आहे, अशा जयघोषाच्या आरोळ्या मारिल्या परंतु स्पार्टन लोकांनीं आपल्या जुलमानें अथेनिअन लोकांना देखील मागें सारिलें. तशा प्रकारची क्रान्ति मात्र कोणाला ही सहन होणार नाहीं.

समाजाचे आडनांवी धुरंधर पतित झाले ह्मणजे ते आपली स्वतःचीं कृत्यें विसरतात. आपल्या पक्षास यश यावें व आपल्या पक्षाची संख्या वाढावी ह्मणून वाटेल तीं अमंगळ पापें करितात. या लोकांना ज्यांच्या जवळ द्रव्य असेल, किंवा ज्यांना कांहीं सरकारी अधिकार असेल, असे लोक भारदस्त आणि वजनदारसे भासतात. स्वतः शहाणपण आणि सद्वर्तन या गुणांचा ते होईल तितका उपहास करितात. कोंबड्यास काच आणि माणि यांतील फरक कळूं नये हें रास्तच आहे. परंतु प्रत्येक विचारी व समजूतदार मनुष्यास शहाणपण आणि सद्वर्तन एवढेच गुण मानार्ह आहेत, असें कबूल करावें लागेल.

परंतु आपला अधिकार गेल्या बद्दल हळहळ करून चंद्राकडे पाहून भोंकणाऱ्या श्वाना प्रमाणें आपणांसच आह्मी समाज-धुरंधर असें ह्मणून घेणारे लोक दुसऱ्याची खोटीनाटीं बरीं वाईट व्यंगें काढीत बसतील तर झालेल्या क्रान्ती बद्दल प्रत्येकांस उलट आनंदच वाटत जाईल व अशाच क्रान्तीं पासून झाल्यास देशाची प्रगति होत जाऊन खऱ्या समाजधुरंधरांची योग्यता कोणत्या प्रकारची असावी हें कल्पनेनें तरी समजत जाईल अशा प्रसंगींच पतित झालेल्या धुरंधरांची खरी योग्यता कसास लागते व लोकांचा आभास दूर होतो.

पतित समाज— धुरंधरांच्या हातून बहुत करून पुढें मागें स्वार्थ साधावा या हेतू शिवाय कधीं ही कोणावर उपकार झालेला नसतोच. परंतु जर त्यांच्या हातून कधीं परोपकार झालाच असेल, तर आह्मी अमक्यास अन्नास लाविलें, आह्मीं अमक्यास उर्जित दशेस आणिलें, अशी ते घमेंडी मारीत असतात. परंतु परकीयांवर जे त्यांचे अनंत उपकार झाले असतील, ते स्वार्थैक दृष्टीपलीकडे दुसऱ्या कोणत्याही हेतूनें अगर कारणानें झालेल नसतात. यांचें कोणतेंही कृत्य पाहूं गेलें तरी, त्यांत आदिमौलिक स्वार्थ हा असावयाचाच. मग हे त्यांस आपल्या मुखानें औदार्य, स्वदेशभक्ति, परोपकार बुद्धि इत्यादि पैकीं कोणत्याही भारदस्त गुणानें प्रमंडित करोत. अशाचा कावा न कळल्यानें यांच्या पेक्षांही अधिक अक्कलमंद पण धनवान लोक यांच्या नादी लागून कांहीं दिवस फसतात. व हे लोक त्यांच्याच भांडवलावर एखादा धंदा उभारून आपला व आपल्या आप्तवर्गीयांचा आणि उरल्या सुरल्यास ज्ञातीयांचा तळीराम गार करून घेऊन ज्यांच्यावर उपकार केले असतील त्यांस आपली पादपरिचर्या करावयास लावितात. अशांचा फायदा होत आहे हें पाहून कचित् प्रसंगीं दुसरे महामूर्ख लोक यांच्या कच्छपीं लागतात ही; आणि हेही आपली थुंकी झेलणाऱ्यां पुढें फारच क्वचित् प्रसंगीं एखादा तुकडा फेंकतात ही. अशा प्रकारची, असल्या ढोंगी समाज धुरंधरांची हकीकत असते. कांहीं दिवस यांचें खरें रूप लोकांस कळत नाहीं, परंतु तें कळूं लागल्यावर जरा अक्कलवान मनुष्य असला ह्मणजे तो यांसच खपेनासा होतो. हळूं हळूं ते त्याचा द्वेष करून त्यांना आपणांपासून परामुङ्मुख करून टाकितात. मागाहून हळूच तोंडावर बुरखा घेऊन त्यांच्यावर अडून लपून क्षुद्र मत्कुणादि जंतूप्रमाणें हल्ला करितात. खरी देशभक्ति असेल तर असल्या प्रकारचे गुण अशा धुरंधरांमध्यें असावेत काय? यांनीं दुसऱ्याच्या द्रव्याचा अपहार करून त्यांस अन्नान्न करीत हिंडविण्याचा यत्न करावा काय? दुसऱ्यांनीं आपलीं कामें फुकट केलीं हें त्यां-